दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक ३१७ I सोमवार ३१ ऑगस्ट २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

## ‘भारतात मुस्लिम नसावेत’ मानणारा हिंदूच नाही : मोहन भागवत



**न्यूयॉर्क :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी अमेरिकेतील न्यूयॉर्क येथे आयोजित ‘वन वर्ल्ड वन ह्युमॅनिटी’ या आंतरधार्मिक परिषदेत हिंदुत्व आणि मुस्लिम समाजाबाबत म हत्त्वपूर्ण विधान केले. भारतात मुस्लिम नसावेत, असे जर कोणी हिंदू विचार करत असेल, तर तो व्यक्ती हिंदूच राहू शकत नाही, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. भारतीय संस्कृतीत धर्म आणि उपासना पद्धती वेगवेगळ्या असल्या तरी संपूर्ण मानवता एकच असल्याचे त्यांनी सांगितले. आपण धर्मगुरू किंवा विद्वान नसून सामान्य समाजात काम करणारा कार्यकर्ता असल्याचे नमूद करत भागवत यांनी भारतीय परंपरेतील ‘एक जग, एक मानवता’ या विचारावर भर दिला. विविध धर्मांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत त्यांनी सामाजिक ऐक्य आणि परस्पर सन्मानाचे महत्त्व अधोरेखित केले.

# ‘हक्काचे आरक्षण देऊ; कुणाचेही काढणार नाही!’

## परभणीच्या सभेत एकनाथ शिंदेंची मराठा आंदोलकांना साद; काळे झेंडे, घोषणाबाजीने राजकीय वातावरण तापले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**परभणी :** राज्यात मराठा समाजाचे नेते सत्तेत असतानाही समाजाच्या प्रश्नांवर निर्णय झाले नाहीत; मात्र महायुती सरकारने सत्तेत आल्यानंतर सातत्याने मराठा समाजाला न्याय देण्याची भूमिका घेतली आहे. इतर समाजघटकांचे आरक्षण कमी न करता मराठा समाजाला त्याच्या हक्काचे आरक्षण देण्याची आमची स्पष्ट भूमिका आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी परभणीत केले. दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शिंदे यांच्या सभेत मराठा आंदोलकांनी काळे झेंडे दाखवत घोषणाबाजी केल्याने सभेचे वातावरण चांगलेच तापले.

खासदार संजय जाधव यांनी स्टेडियम मैदानावर आयोजित केलेल्या शेतकरी व युवा संवाद मेळाव्यात शिंदे बोलत होते. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून निर्माण झालेल्या वातावरणाचे पडसाद सभेच्या सुरुवातीपासूनच जाणवत होते. प्रास्ताविकात खासदार संजय जाधव यांनी मनोज जरांगे पाटील यांची माफी मागितल्यानंतर शिंदे यांनीही जरांगे यांच्या आंदोलनाबाबत भूमिका स्पष्ट केली.

‘मनोज जरांगे यांची मराठा आरक्षणाबाबतची तळमळ प्रामाणिक आहे. आपण स्वतः दोन वेळा त्यांना भेटण्यासाठी गेलो (पान ४ वर)



## वाळूसाठी शेतातून रस्ता देणाऱ्या १३ जणांवर गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**तहसीलदार डॉ. अमित पवार यांच्या कारवाईने वाळू तस्करांना दणका ; ३५ ब्रास वाळूसाठा जप्त...**

**राहुरी :** चिंचोली परिसरातील प्रवरा नदीपात्रातून सुरू असलेल्या अनधिकृत वाळू उपशावर कारवाई करताना वाळू वाहतुकीसाठी शेतातून रस्ते उपलब्ध करून देणाऱ्या १३ जमीनधारकांविरुद्ध राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तहसीलदार डॉ. अमित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाने केलेल्या पाहणीत नदीकाठावर सुमारे ३५ ब्रास अनधिकृत वाळूसाठा आढळून आला.

तलाठी प्रसाद बापुसाहेब शेटे यांनी याबाबत राहुरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तहसीलदार डॉ. पवार यांनी २५ ऑगस्ट रोजी चिंचोली परिसरात प्रत्यक्ष पाहणी करून वाळू उपसा होणाऱ्या ठिकाणांची माहिती घेतली. वाळू वाहतुकीसाठी शेतातून रस्ते उपलब्ध करून देणाऱ्या जमीनधारकांवर कारवाई करण्याच्या सूचना त्यांनी महसूल पथकाला दिल्या. दरम्यान, २६ ऑगस्ट रोजी तहसीलदार डॉ. पवार यांच्या आदेशानुसार महसूल विभागाचे पथक चिंचोली येथे पोहोचले. सात्रळ मंडळ अधिकारी अभिजित खटावकर, ग्रामम हसूल अधिकारी वैभव सावंत, दत्तात्रय वडितके यांच्यासह पोलीस हवालदार सुरज गायकवाड राहुल यादव यांच्या सह पथकाने पाहणी केली असता नदीपात्रातून अनधिकृत वाळू उपसा केल्याचे आढळले. वाळू वाहतुकीसाठी संबंधित जमीनधारकांनी शेतातून रस्ते उपलब्ध करून दिल्याचे महसूल पथकाच्या निदर्शनास आले.या प्रकरणी सुर्यभान बाबुराव काळे, प्रमिला भगवान उराडे, पारवतीबाई गोविंद काळे, सुभाष कोंडाजी बेलकर, आण्णा यशवंत भोसले, गुलाब बळवंत भोसले, बाबासाहेब मारुती भोसले, सारंगधर बळवंत भोसले, आण्णासाहेब सारंगधर भोसले, मालनबाई कारभारी भोसले, रोहीदास कारभारी भोसले, ज्योती प्रविण लाटे आणि ऋतिक योगेश कल्हापुरे, सर्व रा. चिंचोली, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर यांच्याविरुद्ध कायदेशीर फिर्याद दाखल करण्यात आली आहे.

## बिस्किट तोंडात कोंबण्याचा प्रयत्न; चार जणांविरोधात गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**वैजापूर :** मुदतबाह्य अन्नपदार्थांवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या अन्न सुरक्षा अधिकाऱ्याचा रस्ता अडवून, त्यांना मारहाण करण्याची धमकी देत जप्त केलेले बिस्किट जबरदस्तीने तोंडात कोंबण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना वैजापूर येथील गंगापूर चौफुलीवर घडली. या प्रकरणी अन्न सुरक्षा अधिकारी प्रशांत सुरेश अजिंठेकर (वय ५२) यांच्या फिर्यादीवरून वैजापूर पोलीस ठाण्यात चार जणांविरोधात शासकीय कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगर येथील अन्न व औषध प्रशासन कार्यालयात कार्यरत असलेले अन्न सुरक्षा अधिकारी प्रशांत अजिंठेकर यांना वैजापूरमधील लाडगाव रस्त्यावरील ’सलीम पान सेंटर’ येथे मुदतबाह्य अन्नपदार्थ विकले जात असल्याची तक्रार वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून (पान ४ वर)

## डॉ. किरीट सोमय्या यांनी घेतले पैस खांबाचे दर्शन

### भाजपा जिल्हा उपाध्यक्ष शेटे यांच्या हल्ल्याप्रकरणी पोलीस ठाण्यात भेट

**नेवासा :** भाजपचे ज्येष्ठ नेते डॉ. किरीट सोमय्या यांनी रविवारी सकाळी ११ वाजता नेवासे येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरात पैस खांबा जवळ नतमस्तक होऊन मनोभावे दर्शन घेतले. त्यानंतर मंदिर परिसरातील विविध कामाची माहिती घेतली. ऋषिकेश शेटे यांच्यावर झालेल्या हल्ल्या प्रसंगी शहरातील खोलेश्वर मंदिर चौकातील घटनास्थळी भेट देऊन घडलेल्या घटनेबाबत सविस्तर माहिती घेतली. यावेळी संस्थानच्या वतीने वेदांताचार्य देवीदास महाराज म्हस्के यांनी ज्ञानेश्वरी देऊन देऊन सोमय्या यांचा सत्कार केल तर नेवासे तालुका दौऱ्यादरम्यान तालुक्याचे आमदार विठ्ठलराव लंघे यांनी महायुतीच्या वतीने नेवासे पुण्यभूमीत सोमय्या यांचे स्वागत केले. यानंतर विश्वस्त मंडळाच्या वतीने मंदिर विकास कामाबाबत सविस्तर माहिती सोमय्या यांना देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी मंदिर विकास कामाबाबत सविस्तर चर्चा करू व राज्य शासनाच्या वतीने भरीव निधी देण्यासाठी प्रयत्नशील राहू अशी ग्वाही भाजपा नेते डॉ किरीट सोमय्या यांनी नेवासे भेटी दरम्यान दिली. त्यानंतर दुपारी १२ वाजता भाजपा (पान ४ वर)



### साक्षीच्या प्रसंगावधानाने टळला अनर्थ!

## बिबट्याच्या नजरेत आलेला चिमुकला बालंबाल बचावला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर / झरेकाठी : (वार्ताहर) :** राहाता तालुक्यातील हणमंतगाव येथे बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले असतानाच रविवारी भरदुपारी एका साडेतीन वर्षांच्या चिमुकल्याचा जीव थोडक्यात वाचल्याची धक्कादायक घटना घडली. शेजारील मुलीच्या प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळला असून गावकऱ्यांमध्ये भीतीचे सावट अधिक गडद झाले आहे.



हनुमंतगाव परिसरात गेल्या चार दिवसांपासून बिबट्याचा मुक्त संचार सुरू आहे. काही दिवसांपूर्वी एका शेतकऱ्यावर जीवघेणा हल्ला केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी त्याच भागातील आणखी एका शेतकऱ्याच्या मागे बिबट्या लागल्याची घटना घडली होती. त्यानंतर गेल्या दोन दिवसांपासून बिबट्याने अजिंक्य विलास घोलप यांच्या वस्तीवर धुमाकूळ घालत कोंबड्यांचा फडशा पाडला आहे. (पान ४ वर)

## अहिल्यानगर, कर्जत व राहुरी तालुक्यातून सहा लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** जिल्हा पोलीस प्रमुख मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशाने जिल्ह्यात अवैध मावा गुटखा विक्रेत्यांविरुद्ध धडक कारवाई सुरू करण्यात आली आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अहिल्यानगर जिल्ह्यातील नगर शहर कर्जत व राहुरी तालुक्या त एका दिवशी सहा ठिकाणी छापे टाकून सुमारे सहा लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या याप्रकरणी विविध ठिकाणी १५ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहे. पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे अहिल्यानगर जिल्ह्यात अवैद व्यवसायिकांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात प्रतिबंधित असलेली सुगंधित तंबाखू गुटखा मावा याचे (पान ४ वर)

# कावड यात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांचा टेम्पो पलटला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर :** तालुक्यातील लाडगाव – वांजरगाव रोडवर कावड यात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांचा टेम्पो पलटी झाल्याची घटना रविवारी सकाळच्या सुमारास घडली.

या टेम्पोमध्ये तब्बल २० भाविक प्रवास करत होते. वैजापूर तालुक्यातील वांजरगाव येथून नाशिक जिल्ह्यातील जातेगाव येथे असलेल्या पिनाकेश्वर, अर्थात मोठा महादेव मंदिरासाठी दरवर्षी कावड यात्रा निघते. याच कावड यात्रेसाठी भाविक वांजरगाव येथे जात असताना लाडगाव–वांजरगाव रोडवर टेम्पोचा अपघात होऊन तो पलटी झाला.

अपघातात काही भाविक जखमी झाले असून, जखमींना तातडीने वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच वीरगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून, अपघाताचा पुढील तपास सुरू आहे.



अपघातातील जखमी कन्नड तालुक्यातील विटा औराळा येथील असल्याची माहिती समोर येत आहे.

अपघातानंतर वीरगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.पोलिसांकडून कावड यात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांना सुरक्षेच्या दृष्टीने वाहन तपासून ते सुरक्षित आहे की नाही याची काळजी करून वाहतूक करण्याचे आवाहन केले यासोबतच पायी चालत असताना रस्त्याने वाहतूक करणाऱ्या वाहनांपासून सुरक्षित अंतर ठेवण्याचे आवाहन सहायक पोलिस निरीक्षक भिवसने यांनी केले आहे.

**अपघातात ९ जखमी तिघांना घाटीत हलवले...**

अमोल बापू खवळे (वय २४),अविनाश दादासाहेब काकडे वय २९,कृष्ण संजय खवळे (वय २०), किरण संजय लेणेकर (वय २०), गौरव विजय खवळे (वय १७), कृष्ण रतन काळे (वय १६), आदित्य जयवंत पगारे (वय १८), कृष्ण अशोक पवार (वय १८), योगेश साहेबराव जीवरक (वय २६) हे ९ जण अपघातात जखमी झाले आहे. यातील अमोल बापू खवळे, अविनाश दादासाहेब काकडे, कृष्ण संजय खवळे या तिघांवर उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचार करून अधिक उपचारासाठी घाटीत हलवण्यात आले.





## म्हसे परिसरात दोन बोटींची इंजिने ब्लास्ट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**महसूल व पोलिसांची धडक कारवाई**

**श्रीगोंदा :** म्हसे परिसरात महसूल प्रशासन व पोलिस विभागाच्या संयुक्त पथकाने धडक कारवाई करत एक मोठी बोट तसेच तिच्यासोबत असलेल्या एका लहान बोटीची इंजिने ब्लास्टिंग करून नष्ट केली. या कारवाईमुळे परिसरातील बेकायदेशीर व अनधिकृत हालचालींना आळा घालण्याच्या दृष्टीने प्रशासनाने कठोर पाऊल उचलल्याचे स्पष्ट झाले आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक कार्यालयातील सहा. पो. नि. शिरीष देशमुख, महसूल अधिकारी ढगे, ग्रामसेवक सय्यद, आठवले, खैरे, कनगरे तसेच बेलवंडी पोलिस ठाण्याचे पो. नि. सोनवलकर यांच्या संयुक्त पथकाने केली. कारवाईच्या वेळी संबंधित अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी (पान ४ वर)

## साखर १५ रुपयांनी, तर गूळ ७ रुपयांनी स्वस्त!

### गणेशोत्सवापूर्वी दर घसरले; साखर आयातीने ग्राहकांना दिलासा; पण ऊस उत्पादकांसमोर नवे आव्हान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** सणासुदीच्या पार्श्वभूमीवर देशांतर्गत बाजारातील साखरेचे दर नियंत्रणात ठेवण्यासाठी केंद्र सरकारने परदेशातून साखर आयातीला परवानगी दिल्यानंतर पुण्याच्या घाऊक बाजारात साखर आणि गुळाच्या दरात घसरण सुरू झाली आहे. गेल्या आठवड्यात साखरेच्या दरात किलोमागे सुमारे १५ रुपये, तर गुळाच्या दरात ७ ते ८ रुपयांची घट झाली आहे. गणेशोत्सव, नवरात्र आणि दिवाळीच्या काळात साखरेची मागणी वाढणार असताना दर कमी झाल्याने ग्राहकांना दिलासा मिळणार आहे. मात्र, आयातीत साखरेमुळे देशांतर्गत बाजारभावावर



दबाव निर्माण झाल्यास त्याचा परिणाम साखर कारखाने आणि आगामी हंगाम ातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर होऊ नये, याची खबरदारी घेण्याची गरज निर्माण झाली आहे.

गेल्या काही महिन्यांपासून साखरेच्या दरात सातत्याने वाढ होत होती. श्रावणातील सण-उत्सवांमुळे घरगुती ग्राहकांसह मिठाई, बेकरी, पेय आणि अन्य प्रक्रिया उद्योगांकडून मागणी वाढली. त्यातच मागील हंगामातील कमी उत्पादन, पावसाला झालेला विलंब आणि नवीन गाळप हंगाम सुरू होण्यास होणारा विलंब यामुळे बाजारात साखरेचा तुटवडा निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात होती. परिणामी साखरेबरोबरच गुळाच्या दरातही वाढ झाली.

आता केंद्र सरकारने आयातीला परवानगी दिल्यामुळे बाजारातील उपलब्धता वाढण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे सणासुदीच्या काळात कृत्रिम टंचाई निर्माण होऊन दरवाढ होण्याची शक्यता कमी होऊ शकते. ग्राहकांच्या दृष्टीने हा निर्णय निश्चितच दिलासादायक आहे. मात्र, साखरेचे दर नियंत्रणात ठेवताना ऊस उत्पादकांच्या उत्पादन खर्चाचा आणि साखर कारखान्यांच्या आर्थिक गणिताचा विचार होणे तितकेच आवश्यक आहे.

साखरेचा (पान ४ वर)

**साखर उद्योगासाठी संतुलित धोरण हवे**

साखर उद्योग हा केवळ ग्राहकांना साखर पुरवणारा उद्योग नाही. त्याच्याशी लाखो ऊस उत्पादक शेतकरी, कामगार, वाहतूकदार आणि ग्रामीण अर्थव्यवस्था जोडलेली आहे. त्यामुळे बाजारातील किरकोळ दर नियंत्रित करण्याच्या प्रयत्नात संपूर्ण साखर मूल्यसाखळी अस्थिर होणार नाही, याची दक्षता घेणे गरजेचे आहे. आयात किती काळ आणि किती प्रमाणात करायची, देशांतर्गत उत्पादनाची स्थिती काय आहे, आगामी गाळप हंगामात किती साखर उपलब्ध होण्याची शक्यता आहे आणि शेतकऱ्यांना उसाला योग्य दर कसा मिळेल, याचा एकत्रित विचार करूनच धोरण आखले पाहिजे.

# नाथाभाऊंचा अमृत महोत्सव : राजकारणाच्या नव्या समीकरणांची नांदी?

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

महाराष्ट्राच्या राजकारणात काही व्यक्तिमत्त्वे पक्षाच्या चौकटीपेक्षा मोठी होतात. एकनाथ खडसे हे त्यापैकीच एक नाव. सरपंचपदापासून सुरू झालेला त्यांचा राजकीय प्रवास आमदार, मंत्री, विरोधी पक्षनेता आणि राज्यातील ज्येष्ठ राजकीय नेतेपदापर्यंत पोहोचला. पाच दशकांच्या या प्रदीर्घ वाटचालीत त्यांनी सत्तेचा अनुभव घेतला, संघर्ष केला, राजकीय चढ-उतार पाहिले आणि प्रसंगी स्वतःच्याच पक्षाशी संघर्ष करण्याची किंमतही मोजली. मुक्ताईनगर येथे झालेला त्यांचा अमृत महोत्सवी सोहळा त्यामुळे केवळ एका ज्येष्ठ नेत्याचा वाढदिवस नव्हता; तो महाराष्ट्राच्या राजकारणातील एका प्रदीर्घ पर्वाचा राजकीय अर्थ लावणारा प्रसंग ठरला.

विशेष म्हणजे, या सोहळ्याला राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, जयंत पाटील, बाळासाहेब थोरात, रामदास आठवले यांच्यासह विविध पक्षांतील नेते उपस्थित होते. मात्र, भारतीय जनता पक्षाचा एकही वरिष्ठ नेता या कार्यक्रमातदिसला नाही. हा योगायोग मानायचा की राजकीय संकेत, हा प्रश्न स्वाभाविकपणे उपस्थित झाला. कारण महाराष्ट्रात भाजपची संघटनात्मक पायाभरणी करणाऱ्या जुन्या पिढीतील प्रमुख नेत्यांमध्ये खडसेंचे स्थान निर्विवाद आहे. शरद पवारांनी आपल्या भाषणातून याच इतिहासाला उजाळा दिला. महाराष्ट्रात भाजप उभी करण्यामध्ये एकनाथ खडसे आणि प्रमोद महाजन यांचे मोठे योगदान असल्याचे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. १९६७ पासून विधानसभेतील राजकारण पाहणाऱ्या पवारांनी सभागृहातील प्रभावी वक्त्यांच्या आठवणीत खडसेंचा समावेश केला, ही बाब विशेष महत्त्वाची आहे. विरोधी पक्षात असताना सरकारला धारेवर धरणारा, अभ्यासपूर्ण भाषण करणारा आणि सभागृहात आपली छाप पाडणारा नेता म्हणून पवारांनी खडसेंच्या कार्याची दखल घेतली. एवढेच नव्हे, तर मंत्रिमंडळात तब्बल बारा खाती सांभाळणारा नेता म्हणूनही त्यांनी नाथाभाऊंच्या प्रशासकीय क्षमतेचा उल्लेख केला. पवारांचे हे कौतुक केवळ वाढदिवसाच्या शुभेच्छांपुरते मर्यादित नाही. त्यामागे राजकारणाचा मोठा संदर्भ आहे. कारण आज खडसे ज्या पक्षात आहेत, त्या पक्षाचे सर्वेसर्वा स्वतः त्यांच्या पूर्वाश्रमीच्या पक्षातील योगदानाची सार्वजनिकपणे कबुली देतात, तेव्हा त्यातून एक संदेश जातो की, पक्ष बदलला म्हणून राजकीय इतिहास बदलत नाही. जयंत पाटील यांनीही खडसेंच्या राजकीय संघर्षाची आणि विधिमंडळातील प्रभावाची आठवण करून दिली. विरोधी पक्ष कसा सक्षमपणे चालवायचा, हे खडसेंकडून शिकण्यासारखे असल्याचे त्यांनी सांगितले. सभागृहात त्यांचा आवाज घुमत असे, त्यांच्या मांडणीसमोर विरोधकांना उत्तर देणे कठीण जात असे, अशी आठवण त्यांनी सांगितली. सत्ता मिळाल्यानंतरही शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांनी काम केले आणि अशक्य वाटणाऱ्या पाणी योजनांना गती दिली, याकडेही पाटील यांनी लक्ष वेधले. बाळासाहेब थोरात यांचे मनोगत तर खडसेंच्या राजकीय प्रवासाचा वेगळाच पैलू अधोरेखित करणारे होते. १९८५ मध्ये थोरात आमदार झाले आणि १९९० मध्ये खडसे विधानसभेत आले. त्या काळापासून सुरू झालेली मैत्री आजही कायम असल्याचे थोरात यांनी सांगितले. कृष्णा खोरे विकास महामंडळाची स्थापना, तापी खोऱ्याच्या विकासासाठीचा आग्रह आणि शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पाणी पोहोचवण्याची धडपड यांचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. खडसे केवळ राजकारणी नाहीत, तर जनमानसातला माणूस आहेत, हा थोरात यांचा गौरव त्यांच्या राजकीय व्यक्तिमत्त्वाचे सार सांगून जातो. खडसे यांनी स्वतःच्या भाषणातून आपल्या प्रवासाचा पट उलगडताना अनेक राजकीय संदर्भांना हात घातला. १९७८ मध्ये कोथळी ग्रामपंचायत निवडणुकीपासून सुरू झालेला प्रवास, एका मताने पॅनेलचा पराभव, त्यानंतरची संघर्षमय वाटचाल आणि १९९० मधील आमदारकी, या सगळ्याचा त्यांनी उल्लेख केला. प्रमोद महाजन आणि गोपीनाथ मुंडे यांच्या काळातील भाजप आणि आजच्या भाजपमधील फरक अधोरेखित करताना त्यांनी थेट नाव न घेता सध्याच्या राजकारणावर टोला लगावला. हीच बाब खडसेंच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्यपूर्ण बाजू आहे. ते राजकारणात कधीच गुळगुळीत भाषेचे नेते नव्हते. स्पष्ट बोलणे, भूमिका मांडणे आणि आपल्या मनातील अस्वस्थता व्यक्त करणे हा त्यांचा स्वभाव राहिला आहे. त्यामुळेच त्यांना राजकीय मित्रही मिळाले आणि विरोधकही निर्माण झाले. त्यांच्या आयुष्यातील वैयक्तिक दुःखाचाही राजकीय प्रवासावर परिणाम झाला. एकुलत्या एक मुलाचा मृत्यू हा त्यांच्या आयुष्यातील मोठा आघात होता. त्या संकटातून कुटुंबीय, कार्यकर्ते आणि समर्थकांच्या आधाराने पुन्हा उभे राहिल्याचे त्यांनी सांगितले. शरद पवारांनी प्रतिकूल काळात साथ दिल्याची कबुलीही त्यांनी दिली. त्यामुळे भाजपपासून राष्ट्रवादीपर्यंतचा त्यांचा प्रवास हा केवळ सत्तेच्या राजकारणाचा परिणाम नसून वैयक्तिक आणि राजकीय संघर्षातून घडलेली कहाणी आहे. आज पुन्हा त्यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चा सुरू आहेत. या चर्चांकडे केवळ पक्षांतर म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. भाजपच्या जुन्या पिढीतील नेतृत्व आणि सध्याच्या पिढीतील नेतृत्व यांच्यातील बदलत्या संबंधांच्या पार्श्वभूमीवर खडसेंची भूमिका महत्त्वाची ठरू शकते. त्यांच्या परतीने उत्तर महाराष्ट्रातील राजकारणात नवे समीकरण निर्माण होऊ शकते. विशेषतः जळगाव परिसरातील संघटनात्मक राजकारण, लेवा समाजातील प्रभाव, शेतकरी प्रश्न आणि भाजपच्या जुन्या कार्यकर्त्यांशी असलेले संबंध यामुळे त्यांचे महत्त्व कमी झालेले नाही.मात्र, राजकारणात परतण्याची इच्छा आणि परतण्यासाठी आवश्यक असलेली राजकीय जागा या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. भाजपमध्ये आज नेतृत्वाची रचना पूर्वीपेक्षा बदललेली आहे. त्यामुळे खडसे परतले तरी त्यांना पूर्वीचीच राजकीय भूमिका मिळेल, असे गृहीत धरता येणार नाही. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही त्यांची भूमिका भविष्यात किती व्यापक राहील, हा प्रश्न आहे.म्हणूनच मुक्ताईनगरच्या अमृत महोत्सवातील सर्वपक्षीय नेत्यांची भाषणे ही केवळ गौरवोद्गार नसून भविष्यातील राजकीय शक्यतांची सूचक चिन्हे मानावी लागतील. पवारांनी भाजप उभारणीत खडसेंचे योगदान मान्य करणे, जयंत पाटलांनी त्यांच्या संघर्षाचे कौतुक करणे, थोरातांनी दशकांपूर्वीची मैत्री आणि विकासाभिमुख नेतृत्व अधोरेखित करणे आणि खडसेंनी स्वतः जुन्या भाजपची आठवण काढणेया सगळ्याचा एकत्रित अर्थ लावला तर नाथाभाऊंचे राजकीय प्रकरण अजून संपलेले नाही, एवढे निश्चित. पंचाहत्तरी ओलांडलेला नेता राजकारणात किती सक्रिय राहू शकतो, हा प्रश्न त्यांच्या वयापेक्षा त्यांच्या राजकीय अनुभवामुळे अधिक महत्त्वाचा ठरतो. कारण महाराष्ट्राच्या राजकारणात अनुभवाचे भांडवलही अनेकदा निर्णायक ठरते. खडसेंकडे पाच दशकांचा अनुभव, प्रशासनाचा प्रदीर्घ परिचय, विधिमंडळातील प्रभावी कामगिरी आणि जनसंपर्काची स्वतःची शैली आहे.अमृत महोत्सवाच्या निमित्ताने मिळालेला हा सर्वपक्षीय सन्मान त्यांच्या राजकीय प्रवासाचा गौरव आहेच; पण त्याचबरोबर तो भविष्यातील राजकीय शक्यतांकडे पाहण्याचा क्षणही आहे. नाथाभाऊ पुन्हा कोणत्या भूमिकेत दिसतील, कोणत्या राजकीय छावणीत उभे राहतील आणि त्यांच्या पुनरागमनाचा महाराष्ट्राच्या राजकारणावर किती परिणाम होईल, याचे उत्तर काळच देईल. मात्र एक गोष्ट स्पष्ट आहे की, एकनाथ खडसे हे महाराष्ट्राच्या राजकारणातील कालबाह्य झालेले नाव नाही; ते अजूनही अनेक राजकीय समीकरणांना हलवू शकणारे नाव आहे..!

# लोहारे-कासारे पाझर तलावातून सिंचनासाठी व पिण्यासाठी पाणी सोडले



शेतकऱ्यांच्या अडचणीच्या काळात केवळ आश्वासन न देता प्रशासनाकडे पाठपुरावा करून प्रत्यक्ष निर्णयाची अंमलबजावणी होणे महत्त्वाचे असते. लोहारे-कासारे येथील शेतकऱ्यांची पाण्याची गरज लक्षात घेऊन तातडीने पाझर तलावातून पाणी सोडण्यात आल्याने खरीप पिकांना मोठा आधार मिळाला असून, पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही काही प्रमाणात सुटण्यास मदत होणार आहे.

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** संगमनेर तालुक्यातील लोहारे-कासारे येथील पाझर तलावातील पाणी खरीप हंगामातील पिकांच्या सिंचनासाठी तसेच परिसरातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यासाठी सोडण्यात आले आहे. आ. अमोल खताळ यांनी लघु पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने सूचना देत पाणी सोडण्याची कार्यवाही करून घेतल्याने परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. पाणी सोडण्यात आल्याबद्दल शेतकऱ्यांनी आ. खताळ यांचे आभार मानले.

खरीप हंगामातील पिकांना सध्या पाण्याची गरज असून, परिसरातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला असल्याने लोहारे - कासारे परिसरातील शेतकऱ्यांनी आ. अमोल खताळ यांच्याकडे पाझर तलावातील पाणी सोडण्याची मागणी केली होती. या शेतकऱ्यांच्या मागणीची आमदार खताळ यांनी तातडीने दखल घेत. लघु पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना पाझर तलावातील पाणी तातडीने सोडण्याबाबतच्या सूचना दिल्या. त्यानुसार तलावातील पाणी सोडण्यात आले. त्यामुळे खरीप पिकांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध होण्यास मदत होणार असून, परिसरातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची गरजही भागण्यास हातभार लागणार आहे. पाझर तलावाचे पाणी सोडण्यात आल्याने लोहारे - कासारे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकऱ्यांच्या मागणीची तातडीने दखल घेऊन प्रशासनाकडे पाठपुरावा केल्याबद्दल शेतकऱ्यांनी आ. अमोल खताळ यांचे आभार मानले.

# संकटेश्वर महादेव मंदिरात महंत रामगिरी महाराजांचे कीर्तन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी :** संगमनेर तालुक्यातील उंबरी बाळापूर येथील श्री क्षेत्र संकटेश्वर महादेव मंदिरात श्रावणमास भंडारा, महाप्रसाद व कीर्तनाचा कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडला. गोदाधाम तथा श्रीक्षेत्र सरला बेटचे मठाधिपती महामंडलेश्वर महंत रामगिरीजी महाराज यांच्या कीर्तन सेवेसाठी परिसरातील हजारो भाविकांनी गर्दी केली होती. महंत रामगिरी महाराज यांनी हिंदू धर्मग्रंथांचे दाखले देत संस्कृत भाषेतून उपस्थितांना मार्गदर्शन केले. भगवान शिवाच्या नामस्मरणाचे महत्त्व सांगताना त्यांनी तरुण व महिला वर्गाने कुटुंबाची जबाबदारी सांभाळताना मुलांवर चांगले संस्कार करावेत, असे आवाहन केले. शिव व पांडुरंग हे जनकल्याणकारी देव असून त्यांच्या भक्तीतून जीवनात खरे सुख-समाधान मिळते, असे त्यांनी सांगितले. यावेळी मंदिराच्या भव्य सभामंडपाचे कौतुक करताना महाराजांनी गावकऱ्यांनी



कोट्यवधी रुपये खर्च करून उभारलेली ही वास्तू परिसरासाठी अभिमानाची बाब असल्याचे सांगितले. देवकार्यासाठी केलेले दान सत्कारणी लागते, असेही त्यांनी नमूद केले. उंबरी बाळापूर गावाचा सरला बेटाशी असलेला जुना संबंध आणि गंगागिरी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त भजनी मंडळाकडून दिंडी नेण्याची परंपराही त्यांनी अधोरेखित केली. कार्यक्रमाचे आयोजन सरूनाथ उंबरकर, रंगनाथ उंबरकर, अनाजी भुसाळ, नानासाहेब उंबरकर, नवनाथ भुसाळ, साईनाथ सारबंदे, सुरेश थोरात व भगवान मैड यांनी केले. यावेळी मधुकर महाराज कडलक, विलास उंबरकर, सरपंच अर्चना भुसाळ, उपसरपंच मच्छिंद्र भुसाळ यांच्यासह ग्रामस्थ, महिला, तरुण मंडळे व शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. कीर्तनानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. 'हर हर महादेव' व 'राम कृष्ण हरी'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला.

# आंतरशालेय वादविवाद स्पर्धेत पद्मश्री विखे सैनिक स्कूलला सर्वसाधारण विजेतेपद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी :** प्रवरानगर येथील प्रवरा सेंट्रल पब्लिक स्कूल,प्रवरानगर येथे आयोजित करण्यात आलेल्या आंतरशालेय वादविवाद स्पर्धेत पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सैनिक स्कूलने सर्वसाधारण प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले अशी माहिती शाळेचे कमांडंट कर्नल सुभाष घोडगेरी यांनी दिली. संपूर्ण स्पर्धेत सैनिक स्कूलच्या कॅडेट्सनी आत्मविश्वासपूर्ण वक्तृत्व, विषयाची प्रभावी मांडणी, भाषेवरील प्रभुत्व, तार्किक विचारशक्ती आणि उत्कृष्ट सादरीकरणाच्या जोरावर आपली छाप पाडली. या स्पर्धेत वैयक्तिक गटात कॅडेट राजवर्धन पाटील याने द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक, तर कॅडेट श्रेय गांधी याने उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविले. दोन्ही विजेत्यांनी आपल्या प्रभावी वक्तृत्वातून सैनिक स्कूलच्या प्रशिक्षणातून विकसित होणारा आत्मविश्वास, शिस्त, जिद्द, आणि आव्हानांना सामोरे जाण्याची वृत्ती यांचे उत्कृष्ट दर्शन घडविले.

या उल्लेखनीय यशाबद्दल या विजेत्यांचे शाळेचे प्राचार्य राजेश माघाडे विजेत्यांना मार्गदर्शन करणाऱ्या इंग्रजी विषयाचे शिक्षक केतन तेलोरे, नीलिमा पाटील आणि सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष शालिनीताई विखे, प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.सुस्मिता विखे, सहसचिव भारत घोगरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, शिक्षण संचालक डॉ. प्रदीप दिघे, शिक्षण संचालिका लीलावती सरोदे आदींनी अभिनंदन केले आहे.

# शिव-पांडुरंगाच्या भक्तीतूनच जीवनात समाधानाची प्राप्ती : महंत रामगिरी महाराज

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी |** समाजातील तरुण वर्ग आणि महिलांनी कुटुंबाची जबाबदारी सांभाळताना लहान मुलांवर उत्तम संस्कार करणे ही काळाची गरज आहे. अहंकाराने माणसाचा विनाश होतो, जो 'मी'पणा गाजवतो त्याला काळ कधीच सोडत नाही. मात्र, शिव आणि पांडुरंगाची भक्ती करणाऱ्यांना जीवनात खऱ्या सुख-समाधानाची प्राप्ती होते, असे अमृततुल्य मार्गदर्शन महंत रामगिरी महाराज यांनी केले.



उंबरी बाळापूर (ता. संगमनेर) येथील संकटेश्वर महादेव मंदिरात सालाबादप्रमाणे श्रावणमासानिमित्त आयोजित भंडारा महाप्रसाद व कीर्तन सोहळ्यात महंत रामगिरी महाराज बोलत होते. याप्रसंगी महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. भाविकांना मार्गदर्शन करताना रामगिरी महाराज यांनी पौराणिक दाखले देत सांगितले की, भगवान शिवशंकर हे त्या काळातील एक यशस्वी शल्यचिकित्सक (डॉक्टर) होते. त्यांनी श्री गणेशाला हत्तीचे, तर प्रजापती दक्षाला बोकडाचे शीर लावून यशस्वी शस्त्रक्रिया केल्या. प्रजापती दक्षाला स्वतःच्या अहंकाराचे आणि शिवद्रोहाचे फळ मृत्यूच्या रूपाने मिळाले. याउलट, जे निष्ठावान शिवभक्त आहेत, ते मृत्यूलाही घाबरत नाहीत; कारण खुद्द महादेव त्यांचे रक्षणकर्ते असतात. असे सांगितले.

काही लोकांकडे भरपूर संपत्ती असते, मात्र ते देव-धर्माच्या किंवा समाजकार्यासाठी सढळ हाताने मदत करत नाहीत; अशी संपत्ती व्यर्थ जाते, अशी खंत रामगिरी महाराजांनी व्यक्त केली. यावेळी त्यांनी उंबरी बाळापूर ग्रामस्थांनी उभारलेल्या संकटेश्वर महादेव मंदिराच्या भव्य सभामंडपाचे विशेष कौतुक करताना, आसपासच्या तालुक्यात एवढी मोठी आणि सुसज्ज वास्तू कुठेही नसल्याचे गौरवोद्गार काढले. दरम्यान, या भव्य अध्यात्मिक सोहळ्याला राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी, पंचक्रोशीतील शिवभक्त आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्रात प्रथमच नागरी भागातील एकल महिलांचे सर्वेक्षण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :**महाराष्ट्रातील महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायत क्षेत्रातील एकल महिलांचे प्रथमच सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. मात्र काही स्थानिक स्वराज्य संस्थांनी अद्याप घरोघरी जाऊन सर्वेक्षण सुरू केले नसल्याने सर्व पात्र महिलांची नोंद होण्यास अडथळा निर्माण झाला आहे. त्यामुळे या सर्वेक्षणाला मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी साऊ एकल महिला समितीचे राज्य समन्वयक तथा मिशन वात्सल्य शासकीय समितीचे सदस्य मिलिंदकुमार साळवे यांनी केली आहे. कोरोना काळात कुटुंबाचा आधार असलेला कर्ता पुरुष गमावलेल्या महिलांना स्वावलंबी करण्यासाठी तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी हेरंब कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली साऊ एकल महिला समितीने काम सुरू केले. समितीच्या पाठपुराव्यामुळे राज्यातील कोरोना एकल महिलांचे सर्वेक्षण झाले. त्यानंतर सर्व प्रकारच्या एकल महिलांचे सर्वेक्षण करण्यासाठी राज्यभर पाठपुरावा करण्यात आला. अहिल्यानगर जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या सर्वेक्षणातून सुमारे दीड लाख एकल महिलांची नोंद झाली आहे. ग्रामीण भागातील सर्वेक्षण झाले असले तरी नागरी भागातील सर्व महिलांची नोंद झालेली नाही. यासाठी समितीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे पाठपुरावा केला. त्यानंतर महाराष्ट्राचे स्वतंत्र एकल महिला धोरण आखण्याची घोषणा करण्यात आली असून मसुदा समितीचे काम सुरू आहे. नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या उपायुक्त शीला पाटील यांनी राज्यातील महानगरपालिका आयुक्त तसेच नगरपालिका व नगरपंचायतींच्या मुख्याधिकाऱ्यांना घरोघरी जाऊन सर्व प्रकारच्या एकल महिलांचे सर्वेक्षण करण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र ३० ऑगस्टला मुदत संपत असताना अनेक ठिकाणी सर्वेक्षण अपूर्ण असल्याने मुदतवाढ देण्याची मागणी साळवे व समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

# सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना उच्च न्यायालयाचा दिलासा

## वेतनवाढ व पेन्शन फरकाची थकबाकी ९० दिवसांत देण्याचे आदेश

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी :** मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन व वार्षिक वेतनवाढीबाबत महत्त्वपूर्ण निर्णय देत कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. भाऊसाहेब मोहनराव मुरकुटे यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांनी महाराष्ट्र शासनाविरोधात दाखल केलेल्या विविध याचिकांवर न्यायमूर्ती नितीन बी. सूर्यवंशी व न्यायमूर्ती आबासाहेब डी. शिंदे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. न्यायालयाने याचिका अंशतः मंजूर करत कर्मचाऱ्यांच्या बाजूने निकाल दिला. न्यायालयाच्या निर्देशानुसार, सेवानिवृत्तीच्या अखेरच्या वर्षात सहा महिने किंवा त्याहून अधिक काळ सेवा बजावलेल्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीच्या तारखेपासून सुधारित पेन्शन व आर्थिक



लाभ मिळण्यास पात्र ठरविण्यात आले आहे. सेवानिवृत्तीपूर्वीच्या शेवटच्या वेतनात वार्षिक वेतनवाढ समाविष्ट करून पेन्शनची फेरगणना करावी आणि त्यानुसार सुधारित लाभ अदा करावेत, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. तसेच पेन्शन फरकाची थकबाकी ९० दिवसांच्या आत अदा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. याचिका दाखल करण्यासाठी कमिटी सदस्य भाऊसाहेब गाडे, प्रदीप वाल्हेकर, सोपान विखे, दिलीप तांबे, शिवाजी चव्हाण व ज्ञानदेव पवार यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या योगदानाबद्दल सेवानिवृत्त सेवकांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. अजय टी. कानवडे यांनी न्यायालयात बाजू मांडली.

# गोविंद सागर जलाशयाचे आ. हेमंत ओगले यांच्या हस्ते पूजन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील गोविंदसागर जलाशयाचे शासकीय विधिवत जलपूजन काल श्रीरामपूर तालुक्याचे आ. हेमंत ओगले व ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत लांडगे यांच्या हस्ते, तर श्रीरामपूर नगरपालिकेचे नगराध्यक्ष करण ससाणे यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. टाकळीभान येथील गोविंदसागर जलाशयाचे आमदार हेमंत ओगले यांच्या हस्ते जलपूजन श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील गोविंदसागर जलाशयाचे शासकीय जलपूजन आमदार हेमंत ओगले व ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत लांडगे यांच्या हस्ते, नगराध्यक्ष करण ससाणे यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. गोविंदसागर जलाशय पाण्याने भरल्याने परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. जलपूजनाच्या कार्यक्रमाला टाकळीभानसह परिसरातील नागरिक, राजकीय पदाधिकारी, पाटबंधारे विभागाचे अधिकारी-कर्मचारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी तालुका काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रमोद भोसले,ॲड.प्रमोद वलटे,माजी सभापती वंदनाताई मुरकुटे,मयूर पटारे-संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती, ज्ञानेश्वर मुरकुटे, अशोकचे संचालक शिवाजीराव शिंदे, दत्तात्रय नाईक,विलास दाभाडे, भारत भवार, भाऊसाहेब मगर,प्रा.दिलीप कोकणे सर,ॲड.धनराज कोकणे, श्रीधर



गाडे,प्रा.विजय बोर्डे सर,मधुकर कोकणे,बशीर बेग,केरूबापू मगर,बापूराव त्रिभुवन,,महेंद्र संत,भैय्या पठाण,रावसाहेब वाघुले,आबासाहेब आहेर, बापूराव शिंदे, मोहन रणनवरे,संजय रणनवरे, दिनकर पवार,प्रकाश दाभाडे, तुकाराम बोडखे,महेश लेलकर,विष्णू पटारे,राम बोडखे यांच्यासह पाटबंधारे विभागाचे अधिकारी व कर्मचारी आणि टाकळीभान ग्रामस्थ उपस्थित होत दुष्काळाच्या काळात रोजगारासाठी उभारला टेलटँक सन १९७२च्या भीषण दुष्काळाच्या काळात नागरिकांच्या हाताला काम मिळावे, या उद्देशाने तत्कालीन नेते व माजी मंत्री स्व. गोविंदरावजी आदिक साहेब यांच्या पुढाकारातून टेलटँकची उभारणी करण्यात आली होती. त्यामुळे या जलाशयाला केवळ सिंचनाच्या दृष्टीनेच नव्हे, तर टाकळीभान परिसराच्या सामाजिक व आर्थिक इतिहासातही विशेष महत्त्व आहे. आज गोविंदसागर जलाशय पाण्याने भरल्याने शेतकऱ्यांच्या खरीप पिकांसह आगामी रब्बी हंगामासाठीही मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. जलाशयातील पाण्यामुळे परिसरातील शेतीला आणि पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेलाही फायदा होणार आहे.

# हे शेत माझे आहे, बाहेर जा' ; हापसे कुटुंबीयांना मारहाण, गुन्हा दाखल

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** 'हे शेत माझे असून तुम्ही माझ्या शेतातून बाहेर जा', असे म्हणत एका व्यक्तीसह २० ते २५ महिला व पुरुषांनी हापसे कुटुंबीयांना शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना राहुरी तालुक्यातील माहेगाव परिसरात २६ ऑगस्ट रोजी दुपारी साडेचारच्या सुमारास घडली.

याबाबत अनिता बाळासाहेब हापसे (वय ४३, रा. हनुमानवाडी, माहेगाव) यांनी राहुरी पोलिसांत फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, अनिता हापसे व त्यांच्या कुटुंबातील सदस्य शेतात काम करीत असताना नितीन भाऊसाहेब कदम (रा. धामोरी खुर्द) हा २० ते २५ अनोळखी महिला व पुरुषांसह तेथे आला. शेताच्या मालकीवरून वाद घालत आरोपींनी हापसे कुटुंबीयांना शिवीगाळ करून मारहाण केली. तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

मारहाणीत अनिता हापसे व त्यांच्या सुनेच्या गळ्यातील सोन्याच्या पोती तुटून पडून गहाळ झाल्याचेही सांगण्यात आले आहे. या प्रकरणी नितीन कदम याच्यासह २० ते २५ जणांविरुद्ध राहुरी पोलिसांत गुन्हा क्रमांक ९६३/२०२६ नुसार विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द • ख • ल

### जिद्दीची झेप ! संसार सांभाळत 'अपेक्षा' प्राथमिक शिक्षक पदी



**श्रीरामपूर** : तालुक्यातील निपाणी वडगाव येथील अपेक्षा प्रदीप गोराणे यांनी कठीण परिस्थितीवर मात करत, तिची नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र शासन पवित्र पोर्टल भरती प्रक्रियेत प्राथमिक शिक्षकपदी धुळे जिल्हा परिषदेत निवड झाली. निपाणी वडगाव येथील धनगर समाजातील असलेल्या अपेक्षा गोराणे यांनी मराठी माध्यमाच्या शाळेतून प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. त्यांनी संसाराचा गाडा सांभाळत तसेच खाजगी संस्थेवर तुटपुंज्या पगारावर नोकरी करत हे यश मिळवलेले आहे. शालेय शिक्षणापासूनच स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण करून प्रशासकीय अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगल्यामुळे, त्यांनी दररोज कामाव्यतिरिक्त ८ ते १० तास अभ्यासासाठी काढून कठोर परिश्रम घेतले, ज्यामुळे त्यांच्या या जिद्दीला अखेर मोठे यश मिळाले आहे. त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. अपेक्षा या निपाणी वडगाव विविध कार्यकारी सोसायटीचे माजी चेअरमन दत्तात्रय गोराणे यांच्या सुनबाई तर प्राचार्य प्रदीप गोराणे यांच्या पत्नी आहेत.

### महात्मा फुले कृषी विद्यापीठात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात



**राहुरी** : हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त महात्मा फुले कृषी विद्यापीठात राष्ट्रीय क्रीडा दिन विविध क्रीडा उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली व अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे यांच्या नेतृत्वाखाली पदव्युत्तर महाविद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाविषयक जागरूकता निर्माण करणे, शारीरिक तंदुरुस्ती, संघभावना, शिस्त व निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी भव्य सायकल रॅली, फुटबॉल, बॅडमिंटन तसेच मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले. कृषी विद्यापीठ सायकलिंग क्लब व राहुरी सायकलिंग क्लबच्या सदस्यांनी सायकल रॅलीत उत्स्फूर्त सहभाग घेतला. यावेळी काढणीपश्चात तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. विक्रम कड, नियोजन अधिकारी डॉ. नारायण मुसमाडे, क्रीडा अधिकारी डॉ. बाबासाहेब भिंगारदे, राहुरी सायकलिंग क्लबचे अध्यक्ष अरुण ताकटे यांच्यासह अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला. पदव्युत्तर व कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये फुटबॉल स्पर्धा, तर कर्मचारी व विद्यार्थ्यांसाठी बॅडमिंटन स्पर्धा घेण्यात आली. विविध उपक्रमांतून 'खेळातून आरोग्य, आरोग्यातून ऊर्जा आणि ऊर्जेतून यश' हा संदेश देण्यात आला.

### शिवसेना शहराध्यक्षपदी महेश कुलकर्णी यांची फेरनिवड



**पुणतांबा** : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पुणतांबा शहराध्यक्षपदी महेश दिगंबर कुलकर्णी यांची फेरनिवड करण्यात आली. उत्तर जिल्हाध्यक्ष सचिन कोते यांनी नियुक्तीचे पत्र त्यांना दिले आहे. शिवसेना स्थापनेपासून महेश कुलकर्णी कार्यरत असून पक्षाशी एकनिष्ठ म्हणून त्यांची ओळख आहे. निष्ठावान शिवसैनिक म्हणून ते सर्वत्र परिचित आहे. त्यांनी आतापर्यंत केलेले सामाजिक कार्य सर्वसामान्यांच्या प्रश्नाला वाचा फोडली. रक्तदान आरोग्य दूत या कार्यामुळे त्यांचा थेट संपर्क शिवसेनेचे कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे यांच्याशी झाला. जिल्हा संपर्कप्रमुख आमदार सुनील शिंदे, आशुतोष मार्कंडेय, सचिन कोते, प्रमोद लबडे, संजय दंडवते, अनिल बोराडे, भरत मोरे यांच्या नेतृत्वाखाली पक्ष वाढीचे काम सुरू असून सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी आपण यापुढेही कार्यरत राहू असा विश्वास कुलकर्णी यांनी यावेळी व्यक्त केला.

### स्थानिक समस्यांवर जागतिक दर्जाचे उपाय शोधा : आ. विवेक कोल्हे




**कोपरगाव** : शेती, वाहतूक, आरोग्य, घनकचरा व्यवस्थापन, अन्न व सुरक्षा, उद्योग तसेच पाणी वितरणातील स्थानिक समस्या सोडविण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे गरजेचे आहे. हॅकॅथॉनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी स्थानिक समस्यांवर जागतिक दर्जाचे नाविन्यपूर्ण व परिणामकारक उपाय शोधावेत, असे आवाहन आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी केले. संजीवनी विद्यापीठ आयोजित 'द ग्रँड फिनाले ऑफ स्मार्ट कोपरगाव हॅकॅथॉन २०२६' या राष्ट्रीय स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रेसिडेंट अमित कोल्हे होते. यावेळी तहसीलदार तथा पदोन्नती झालेले उपजिल्हाधिकारी महेश सावंत, नगराध्यक्ष पराग संधान, कृषी अधिकारी मनोज सोनवणे, कुलगुरू डॉ. ए. जी. ठाकूर, सर्कल ऑफिसर मच्छिंद्र पोकळे, हनुमंत फेरे आदी उपस्थित होते. स्पर्धेत शेती, शिक्षण, अन्न व सुरक्षा, दळणवळण, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग, आरोग्य, कचरा व्यवस्थापन आणि खुल्या नवकल्पनांवर तंत्रज्ञानाधारित उपाय सुचविण्यासाठी देशभरातील १०० टीममधील सुमारे ४०० अभियांत्रिकी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे. विद्यापीठाच्या वतीने एक लाख रुपयांचे बक्षीस असून, आ. कोल्हे यांनीही एक लाख रुपयांचे अतिरिक्त बक्षीस जाहीर केले. कचरा व्यवस्थापनातील सर्वोत्कृष्ट प्रकल्पाला अमित कोल्हे यांच्या वतीने प्रायोजकत्व देण्यात येणार आहे. युवकांनी नोकरी शोधणारे नव्हे, तर नोकरी निर्माण करणारे उद्योजक बनावे, असे आवाहन आ. कोल्हे यांनी केले.

# लोणी पोलिसांच्या कारवाईत २० लाखांचा हायवा जप्त

## २० लाखांचा हायवा व ४ ब्रास वाळू जप्त




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : बेकायदा वाळू वाहतुकी विरोधात लोणी पोलिसांनी पहाटेच्या सुमारास धडक कारवाई करत, तब्बल २० लाख १६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. बाभळेश्वर चौकातून राजुरीच्या दिशेने वाळू वाहतूक करणारा टाटा कंपनीचा MH-17 DY-9293 क्रमांकाचा हायवा डंपर पोलिसांनी ताब्यात घेतला. या वाहनामध्ये अंदाजे चार ब्रास वाळू आढळून आली.

याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध लोणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३० ऑगस्ट रोजी पहाटे चार वाजण्याच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. बाभळेश्वर चौकातून राजुरी गावाच्या दिशेने संशयास्पदरीत्या वाळू वाहतूक करणारे वाहन जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये अंदाजे चार ब्रास वाळू आढळून आली. पोलिसांनी MH-17 DY-9293 क्रमांकाचा हायवा डंपर आणि त्यातील वाळू असा एकूण २० लाख १६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

जप्त केलेल्या हायवाची किंमत सुमारे २० लाख रुपये, तर वाळूची किंमत अंदाजे १६ हजार रुपये असल्याचे पोलिस अहवालात नमूद करण्यात आले आहे. फिर्याद पोलीस कर्मचारी सचिन भाऊसाहेब बर्डे यांनी दिली असून, अधिकचा तपास लोणी पोलीस स्टेशनचे पी आय संग्राम आठरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी करीत आहेत.

### योगेश कुंढारेविरुद्ध गुन्हा

या प्रकरणी योगेश गोरख कुंढारे (वय ३२, रा. शंकरनगर, कोपरगाव, ता. कोपरगाव, जि. अहिल्यानगर) याच्याविरुद्ध लोणी पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ४४२/२०२६ दाखल करण्यात आला आहे. भारतीय न्याय संहिता सन २०२३ मधील कलम ३०३ (२) तसेच महाराष्ट्र पर्यावरण संरक्षण कायदा कलम ३ व १५ अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

### वाळूचा स्रोत तपासणार

या कारवाईमुळे परिसरातील बेकायदा वाळू वाहतुकीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. जप्त करण्यात आलेली वाळू नेमकी कुठून आणण्यात आली होती, तिच्या वाहतुकीसाठी परवानगी होती का, तसेच या प्रकरणामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

## विद्यानिकेतन अकॅडमीत राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिरसगाव** : ॲड. रावसाहेब शिंदे प्रतिष्ठान संचलित विद्यानिकेतन अकॅडमीमध्ये हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाप्रेम, शिस्त, संघभावना, शारीरिक तंदुरुस्ती आणि खिलाडूवृत्ती रुजविण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात क्रीडा साहित्याच्या पूजनाने झाली. त्यानंतर प्राचार्या वर्षा धामोरे यांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. ऐश्वर्या माखिजा व स्वरा बंगाळ यांनी म्युझिकल मास पी.टी.चे प्रभावी प्रात्यक्षिक सादर केले. इयत्ता नववीतील कुशल कोठारी याने राष्ट्रीय क्रीडा दिनाचे महत्त्व विशद केले. यावेळी विद्यार्थ्यांनी सामूहिक क्रीडा शपथ घेतली.

प्राचार्या वर्षा धामोरे यांनी खेळामुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळून व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो, असे सांगितले. शाळेच्या प्रांगणात विविध मैदानी खेळांचे आयोजन करण्यात आले होते.

दरम्यान, विद्यानिकेतन संकुलाचे खजिनदार डॉ. राजीव शिंदे यांचा जन्मदिन राष्ट्रीय क्रीडा दिनीच असल्याने त्यांचा वाढदिवसही उत्साहात साजरा करण्यात आला. शिक्षक व कर्मचाऱ्यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमासाठी टी. ई. शेळके, डॉ. प्रेरणा शिंदे, अभियंता रोहित शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन साईप्रसाद कुलकर्णी व जपनीत कौर ठकराल यांनी केले. आयोजनासाठी अमित त्रिभुवन, सपना भायभंग, विजय रणदिवे, सतीश थोरात, दत्ता घोरपडे व तेजस त्रिभुवन यांनी परिश्रम घेतले.

## नेत्रदान पंधरवड्यानिमित्त रघुनाथ नेत्रालयात विशेष शिबिर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी** : नेत्रदान पंधरवड्यानिमित्त श्री तिरुपती शिक्षण संस्थेच्या संयोजनाने डॉ. लहाने यांचे रघुनाथ नेत्रालय, छत्रपती संभाजीनगर येथे शालेय विद्यार्थ्यांसाठी विशेष नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरात तब्बल ६१५ विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी १४८ विद्यार्थ्यांना नेत्र विषयी आजार असल्याचे आढळून आले. या शिबिरात डॉ. अक्षय कर्डीले, डॉ. अर्पिता पेशट्टीवार (कर्डीले) तसेच रघुनाथ नेत्रालयाच्या संपूर्ण वैद्यकीय टीमने विद्यार्थ्यांची तपासणी केली. श्री तिरुपती शिक्षण संस्थान तर्फे डॉ. लहाने यांचे रघुनाथ नेत्रालय आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे आभार मानले.

पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांच्या संकल्पनेतून लहान मुलांची नेत्र तपासणी आयोजित करण्यात आले. सध्या लहान मुलांमध्ये विविध प्रकारचे नेत्रविकार मोठ्या प्रमाणात आढळून येत असून, त्यांचे वेळीच निदान व योग्य उपचार न झाल्यास भविष्यात दृष्टी कमी होण्यासह गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात. त्यामुळे बालवयातच नियमित नेत्र तपासणी करून आवश्यक उपचार करणे गरजेचे आहे, असे मत डॉ. अक्षय कर्डिले यांनी व्यक्त केले. अशा शिबिरांच्या माध्यमातून लहान मुलांच्या डोळ्यांची तपासणी करून आजारांचे लवकर निदान आणि उपचार करणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचेही डॉ. कर्डिले यांनी सांगितले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी पद्मश्री वसंतदादा पाटील शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. शालेय स्तरावर नियमित नेत्र तपासणी करून विद्यार्थ्यांमधील नेत्रविकारांचे लवकर निदान व उपचार करणे किती महत्त्वाचे आहे, हे या उपक्रमातून अधोरेखित झाले.

## शेतात पाणी भरताना तरुणावर बिबट्याची झडप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**प्रवरानगर** : लोणी कुरकुटे वस्ती शिवारातील शृंखला हॉस्टेलच्या मागील बाजूस रविवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास शेतात पाणी भरत असलेल्या तरुणावर बिबट्याने अचानक हल्ला केल्याची थरारक घटना घडली. रविंद्र रावसाहेब शिंदे (वय २७) हे संतोष लक्ष्मण कुरकुटे यांच्या शेतजमिनीत पाणी भरत असताना बिबट्याने त्यांच्यावर झडप घातली. यावेळी त्यांच्या पत्नीही घटनास्थळी उपस्थित होत्या. या घटनेने परिसरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रविंद्र शिंदे हे शेतात पाणी भरण्याचे काम करत असताना अचानक बिबट्या त्यांच्या जवळ आला आणि त्याने त्यांच्यावर हल्ला केला. अनपेक्षितपणे झालेल्या हल्लयामुळे शिंदे यांची धांदल उडाली. त्यांनी प्रसंगावधान राखत बिबट्यापासून बचाव करण्याचा प्रयत्न केला. या हल्लयात ते जखमी झाले. जखमी रविंद्र शिंदे यांना तातडीने प्रवरा मेडिकल ट्रस्टच्या रुग्णालयात नेण्यात आले.

त्यानंतर प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी अहमदनगर येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. तेथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. मानद वन्यजीव रक्षक विकास म्हस्के, लोणी ग्रामपंचायत सदस्य प्रविण विखे आणि संदीप गोसावी यांनी घटनास्थळी पोहोचून मदतकार्य सुरू केले. दरम्यान, संबंधित परिसरात मादी बिबट्या आपल्या काही पिलांसह फिरत असल्याची माहिती समोर आली आहे. पिलांसह असलेल्या मादी बिबट्याने आपल्या अधिवासाच्या सुरक्षेसाठी हल्ला केला असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शृंखला हॉस्टेल परिसर, कुरकुटे वस्ती, लोणी-हसनापूर शिवार आणि लगतच्या शेतवस्त्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. बिबट्याचा वावर असल्याने शेतकरी, महिला, लहान मुले तसेच पशुधनाच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. वनविभागाने या परिसरात तातडीने पाहणी करून बिबट्याच्या हालचालींचा मागोवा घ्यावा आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

बिबट्या व त्याच्या पिलांचा वावर नेमका कोणत्या भागात आहे, याबाबत वनविभागाने नागरिकांना माहिती देऊन जनजागृती करणे गरजेचे आहे. नागरिकांनी बिबट्या दिसल्यास त्याच्या जवळ जाण्याचा अथवा त्याला हुसकावण्याचा प्रयत्न न करता तातडीने वनविभागाला माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे. रविंद्र शिंदे यांच्यावरील हल्लयामुळे परिसरात पुन्हा एकदा बिबट्याच्या वाढत्या वावराची चिंता निर्माण झाली असून, वनविभागाच्या पुढील कारवाईकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## वनरक्षक वनपाल संघटनेकडून सुंबे कुटुंबीयांना १ लाख १५ हजारांची मदत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**झरेकाठी** : वन विभागात तब्बल १८ वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावणारे वनरक्षक भाऊसाहेब सुंबे यांचे रविवार, दि. २६ जुलै २०२६ रोजी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या अचानक निधनाने वन विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि सहकाऱ्यांमध्ये हळहळ व्यक्त होत असतानाच, संकटाच्या काळात सुंबे कुटुंबीयांच्या पाठीशी उभे राहत वनरक्षक वनपाल संघटनेने १ लाख १५ हजार रुपयांची आर्थिक मदत देत माणुसकीचा आदर्श निर्माण केला. केंद्रीय अध्यक्ष अजय भाऊ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संघटनेने हा मदतीचा निर्णय घेतला. कुटुंबातील कर्त्या व्यक्तीचे अचानक निधन झाल्यानंतर निर्माण झालेल्या आर्थिक अडचणीच्या काळात कुटुंबीयांना आधार मिळावा, या सामाजिक भावनेतून ही मदत करण्यात आली.

संघटनेच्या या संवेदनशील भूमिकेमुळे 'संकटात सहकारी एकमेकांच्या पाठीशी' या संघटनेच्या भूमिकेची प्रचिती आली. भाऊसाहेब सुंबे यांनी आपल्या १८ वर्षांच्या सेवाकाळात नगर, राहता, राहुरी, मिरजगाव तसेच वडवणीव विभागात वनरक्षक म्हणून जबाबदारी सांभाळली. वनसंपदेचे संरक्षण, वन्यजीव संवर्धन आणि वन विभागाशी संबंधित विविध शासकीय जबाबदाऱ्या पार पाडताना त्यांनी कर्तव्याला नेहमीच प्राधान्य दिले. प्रामाणिक, कर्तव्यनिष्ठ आणि जबाबदार कर्मचारी म्हणून त्यांनी सहकाऱ्यांच्या मनात आपले स्थान निर्माण केले होते. सुंबे यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी आणि भाऊ असा परिवार आहे. अचानक आलेल्या या दुःखद प्रसंगामुळे कुटुंबीयांवर मोठे संकट कोसळले. अशा परिस्थितीत संघटनेने केवळ सांत्वन न करता प्रत्यक्ष आर्थिक मदतीचा हात पुढे करून कुटुंबीयांना आधार दिला, ही बाब विशेष कौतुकास्पद ठरली. या वेळी वनरक्षक वनपाल संघटनेचे अहिअल्यानगर जिल्हाध्यक्ष राजेंद्र आल्हाट, सर्कल अध्यक्ष पंकज देवरे, महाराष्ट्र सरचिटणीस तानाजी भुजबळ यांच्यासह केंद्रीय सदस्य संदीप भोसले, आजिनाथ भोसले, शैलेंद्र बडदे, समाधान चव्हाण, ननवरे भाऊसाहेब, सचिन गायकवाड तसेच संघटनेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. दुःखाच्या प्रसंगी मदतीचा हात पुढे करणाऱ्या वनरक्षक वनपाल संघटनेचे सुंबे कुटुंबीयांनी आभार मानले.

## अहिल्यानगर जिल्ह्यातील तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी कुंभमेळा विशेष निधीची गरज

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या धर्तीवर राज्यातील प्रमुख तीर्थक्षेत्रांचा विकास केला जात आहे. कुंभमेळ्याच्या निमित्ताने देशभरातून येणारे लाखो भाविक, साधू-संत आणि पर्यटक महाराष्ट्रातील इतर धार्मिक स्थळांनाही भेटी देतात. अहिल्यानगर हा ऐतिहासिक आणि धार्मिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा जिल्हा असून, येथील प्रसिद्ध तीर्थक्षेत्रांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य सरकारने विशेष कुंभमेळा निधी मंजूर करावा, अशी आग्रही मागणी आता जोर धरू लागली आहे.जिल्ह्यात शिर्डीचे श्री साईबाबा मंदिर,नेवासा तालुक्यातील शनि शिंगणापूर, देवगड, नेवासा येथील (पैस खांब) मंदिर,मढीचे कानिफनाथ महाराज मंदिर, अष्टविनायकांपैकी सिद्धटेक, राशीनची जगदंबा देवी, भगवानगड, अकोले येथील अगस्ती आश्रम आणि ऐतिहासिक हरिश्चंद्रगड यांसारखी अनेक जगप्रसिद्ध व श्रद्धेची ठिकाणे आहेत. या सर्व ठिकाणी दरवर्षी कोट्यवधी भाविक येतात. कुंभमेळ्यादरम्यान ही संख्या कित्येक पटीने वाढणार असल्याने या सर्व धार्मिक स्थळांचा विकास करणे ही काळाची गरज बनली आहे.

**आवश्यक मूलभूत सुविधा आणि मागण्या:**

रस्ते विकास: सर्व प्रमुख तीर्थक्षेत्रांना जोडणारे रस्ते किमान चौपदरी (४ लेन) करण्यात यावेत. भक्त निवास व निवारा: भाविकांच्या मुक्कामासाठी सुसज्ज व स्वच्छ भक्त निवासांची उभारणी व्हावी. पिण्याचे पाणी व स्वच्छता: शुद्ध पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी सोय आणि आधुनिक सुलभ शौचालयांची निर्मिती,पार्किंग व वाहतूक व्यवस्था: वाढत्या वाहनांच्या संख्येचा विचार करता स्वतंत्र व प्रशस्त पार्किंग क्षेत्रे तयार करावीत.

**प्रसादालय व अन्नछत्र :**

भाविकांसाठी भव्य व स्वच्छ प्रसादालयांची उभारणी करण्यात यावी. प्रशासन व लोकप्रतिनिधींच्या संयुक्त प्रयत्नांची गरज: या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी जिल्ह्यातील दोन्ही खासदार, पालकमंत्री, विधानपरिषदेच्या उपसभापती प्रा. राम शिंदे यांच्यासह सर्व आमदार, जिल्हा प्रशासन आणि प्रसारमाध्यमांनी एकाच मंचावर येणे गरजेचे आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष या तीर्थक्षेत्रांना भेटी देऊन तेथील अडचणींचा आढावा घ्यावा आणि तातडीने सुधारित विकास आराखडा तयार करावा.

त्याचप्रमाणे जिल्ह्यातील डॉक्टर, वकील, इंजिनिअर, आर्किटेक आणि समाजसेवक यांसारख्या बुद्धिमंत व तज्ज्ञ वर्गाने एकत्र येऊन कुंभमेळ्याच्या काळात येणाऱ्या भाविकांचे स्वागत आणि व्यवस्थापन उत्तम रीतीने कसे करता येईल, यासाठी योगदान दिले पाहिजे. लोकप्रतिनिधींचा राजकीय पुढाकार, प्रशासकीय तत्परता आणि नागरिकांचा सहभाग याच्या जोरावरच अहिल्यानगर जिल्हा आगामी कुंभमेळ्याच्या स्वागतासाठी सज्ज होऊ शकतो अशा नागरिकांच्या प्रतिक्रिया उमटत आहे

# कृष्णाच्या कुटुंबीयांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहणार : आ. खताळ

## शेततळ्यात पडून १२ वर्षीय विद्यार्थ्याचा मृत्यू । बिबट्याच्या वावराचा मुद्दा ऐरणीवर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**संगमनेर** : तालुक्यातील जवळे कडलग येथे शेततळ्यात पाय घसरून कृष्णा वसंत पवार (वय १२) या शाळकरी विद्यार्थ्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना शनिवारी (दि. २९) घडली. कृष्णा हा बिबट्याच्या भीतीने शेततळ्यात पडल्याचे त्याच्या कुटुंबीयांकडून सांगण्यात आले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, बिबट्याच्या वावराचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

घटनेची माहिती मिळताच आमदार अमोल खताळ यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पवार कुटुंबीयांचे सांत्वन केले. या दुःखद प्रसंगी पवार कुटुंबीयांच्या पाठीशी ठामपणे उभे राहून शासनाकडून मिळणारी आवश्यक मदत मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली. कृष्णाच्या मृत्यूची घटना अत्यंत मन हेलावून टाकणारी आहे. निष्पाप बालकाच्या मृत्यूने पवार कुटुंबीयांवर मोठे दुःख कोसळले आहे. त्यांना शासनाच्या माध्यमातून आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला जाईल, असे आ. खताळ यांनी सांगितले.

बिबट्याच्या वावराबाबत अधिकाऱ्यांना सूचना कृष्णा बिबट्याच्या भीतीने शेततळ्यात पडल्याचे कुटुंबीयांचे म्हणणे असल्याने घटनेची वस्तुस्थिती समोर आणण्यासाठी अधिक तपास करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. मानवी वस्त्यांच्या परिसरात बिबट्यांचा वावर वाढत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. वनविभागाने केवळ पाहणी न करता नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात.

वारंवार बिबट्यांचा वावर आढळणाऱ्या ठिकाणी पाहणी करून आवश्यकतेनुसार पिंजरे लावावेत व नियमानुसार बिबट्यांना जेरबंद करण्यासाठी कार्यवाही करावी, अशी मागणीही आ. खताळ यांनी केली. यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी नम्रता हिरे, पोलीस उपनिरीक्षक विकास काळे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**जाहिर प्रगटन**

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः जन्म-मृत्यु/एस/आर/२२८/२०२६
नेवासा दिनांक : २७/०७/२०२६

अर्जदार श्री श्रीम-नितीन शिवाजी जाधव, रा.माळेवाडी खालसा, नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम./कु. नितीन शिवाजी जाधव, रा.माळेवाडी खालसा, ता. नेवासा यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे. सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.१, जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-नितीन शिवाजी जाधव, गावाचे नाव-प्रवरासंगम, जन्म दिनांक-१५/०१/१९९०

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहसीलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

## पान १ वरुन

### साखर १५ रुपयांनी, तर गूळ ७ रुपयांनी स्वस्त!

बाजारभाव कमी करण्यासाठी आयात वाढली आणि त्याचा परिणाम देशांतर्गत साखरेच्या दरावर झाला, तर साखर कारखान्यांच्या उत्पन्नावर दबाव येऊ शकतो. त्याचा अप्रत्यक्ष परिणाम ऊस खरेदी दरावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. गेल्या काही वर्षांत खत, औषधे, मजुरी, सिंचन, वीज आणि वाहतूक खर्चात मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादन खर्चाच्या तुलनेत योग्य मोबदला मिळणे आवश्यक आहे. सरकारने ग्राहकांना स्वस्त साखर उपलब्ध करून देणे योग्य असले तरी स्वस्त साखरेचा भार शेतकऱ्यांच्या खांद्यावर टाकला जाऊ नये, हीच खरी कसोटी आहे. आयात धोरण तात्पुरत्या बाजार संतुलनासाठी असावे; देशांतर्गत ऊस उत्पादक आणि साखर उद्योगाच्या दीर्घकालीन हिताला बाधा आणणारे नसावे. दरवाढीच्या पार्श्वभूमीवर व्यापाऱ्यांकडून म ोठ्या प्रमाणात साखरेची साठेबाजी किंवा अतिरिक्त खरेदी झाल्याची शक्यता व्यक्त होत होती. मात्र देशात पुरेसा साखर साठा असल्याचे सरकारचे म्हणणे आहे. त्यामुळे उपलब्ध साखर बाजारात नियमि तपणे येणे आणि कृत्रिम टंचाई निर्माण होऊ न देणे महत्त्वाचे ठरणार आहे. यासाठी सप्टेंबरपासून मासिक कोट्याऐवजी १५ दिवसांची कोटा पद्धत लागू करण्याचा निर्णय महत्त्वाचा ठरू शकतो. निश्चित कोट्यापैकी ४० टक्के साखर पहिल्या आठवड्यात बाजारात आणावी लागणार असून उर्वरित साखर पुढील आठवड्यात विकावी लागणार आहे. त्यामुळे साखर कारखान्यांकडील साठा बाजारात नियमितपणे उपलब्ध होण्यास मदत होईल. मागणी-पुरवठ्याचे अधिक प्रभावी निरीक्षण करता येईल आणि गरज भासल्यास अतिरिक्त कोटा जाहीर करण्याचा पर्यायही सरकारकडे राहणार आहे. सणासुदीच्या काळात ग्राहकांना स्वस्त साखर मिळणे स्वागतार्ह आहे. पण त्यासाठी ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचा बळी जाता कामा नये. बाजारातील साखरेचे दर नियंत्रणात ठेवतानाच कारखान्यांना आर्थिक स्थैर्य आणि शेतकऱ्यांना त्यांच्या उसाला योग्य मोबदला मिळेल, अशी संतुलित भूमिका सरकारला घ्यावी लागणार आहे. कारण साखरेचा भाव कमी होणे हा ग्राहकांसाठी दिलासा असला, तरी ऊस उत्पादकाच्या हातात योग्य दर राहणे हेच ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या आरोग्यासाठी अधिक महत्त्वाचे आहे.

### साक्षीच्या प्रसंगावधानाने टळला अनर्थ!

विवारी दुपारी सुमारे एक वाजण्याच्या सुमारास बिबट्या पुन्हा घोलप यांच्या वस्तीवर आला. यावेळी त्याने कोंबडीवर झडप घालण्याचा प्रयत्न केला; मात्र ती त्याच्या तावडीत सापडली नाही. त्याच वेळी अवघ्या १५ ते २० फुटांच्या अंतरावर अद्विक अजिंक्य घोलप (वय साडेतीन वर्षे) हा चिमुकला खेळत होता. कोंबडीवरील हल्ला फसल्याने बिबट्याची नजर त्या बालकावर खिळल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. याच वेळी शेजारील वस्तीवरील साक्षी सुनील घोलप हिचे त्या दिशेने लक्ष गेले. परिस्थितीचे (गांभीर्य ओळखत तिने क्षणाचाही विलंब न करता धावत जाऊन अद्विकला उचलले आणि गोठ्याकडे धाव घेत त्याला सुरक्षित ठिकाणी नेले. साक्षीच्या धाडसामुळे आणि प्रसंगावधानामुळे संभाव्य दुर्घटना टळली. ग्रामस्थांच्या मते, साक्षी वेळेत धावली नसती तर मोठा अनर्थ घडण्याची शक्यता नाकारता येत नाही घटनेची माहिती मिळताच मानद वन्यजीव रक्षक विकास म्हस्के यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. नदीकाठाजवळ लावलेला पिंजरा हलवून घोलप यांच्या वस्तीवर बसविण्यात आला. वनविभागाने परिसरात एकूण तीन पिंजरे लावले असून बिबट्याला जेरबंद करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान थर्मल ड्रोनच्या साहाय्याने बिबट्याच्या हालचालींवर नजर ठेवण्यात आली. मात्र, अद्यापही हा चलाख बिबट्या पिंजऱ्यात अडकण्यास तयार नसल्याने ग्रामस्थांची चिंता वाढली आहे. शेतकरी, महिला आणि लहान म ुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून बिबट्याचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

### म्हसे परिसरात दोन बोटींची इंजिने ब्लास्ट

उपस्थित होते. महसूल प्रशासन आणि पोलिस विभागाने समन्वय साधत केलेल्या या कारवाईमुळे म्हसे परिसरात अनधिकृतपणे सुरू असलेल्या हालचालींना चाप बसण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, केवळ कागदी कारवाई न करता प्रत्यक्ष घटनास्थळी बोटींची इंजिने नष्ट करण्यात आल्याने प्रशासनाच्या भूमिकेला गांभीर्य प्राप्त झाले आहे.दरम्यान, कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या तसेच अनधिकृत कृत्यांना प्रोत्साहन देणाऱ्या व्यक्ती किंवा घटकांविरोधात यापुढेही आवश्यकतेनुसार कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासन व पोलिस विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.
'बेकायदेशीर कारवायांना थारा नाही' असा स्पष्ट संदेश या संयुक्त कारवाईतून देण्यात आला आहे. म्हसे परिसरातील पुढील घडाम ोडींकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### डॉ. किरीट सोमय्या यांनी घेतले पैस खांबाचे दर्शन

जिल्हा उपाध्यक्ष ऋषिकेश शेटे यांच्यावर झालेल्या हल्ल्या प्रसंगी शहरातील खोलेश्वर मंदिर चौकातील घटनास्थळी भेट देऊन घडलेल्या घटनेबाबत सविस्तर माहिती घेतली. तेथून थेट नेवासे पोलीस ठाण्यात जाऊन अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्या समवेत झालेल्या बैठकीत सदरील घटना गांभीर्याने घेत पुन्हा प्रशासनाच्या वतीने पुढील २४ तासाच्या आत शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याबाबत चर्चा करण्यात आली. यापुढे संबधित ठिकाणी अतिक्रमण होणार नाही याबाबत नगरपंचायत व बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना देखील सांगण्यात आले. यावेळी आमदार विठ्ठलरावं लंघे नगराध्यक्ष डॉ करण घुले, भाजपा जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर यांच्यासह महायुतीचे सर्व नगरसेवक व भाजपचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यानंतर शहरातील विवेकानंद नगर येथील भाजपचे जेष्ठ नेते दिनकरराव ताके पाटील यांच्या निवासस्थानी भेट देत जुन्या आठवणींना त्यांनी उजाळा देत ताके यांच्या तब्येतीची विचारपूस करत चहा पान घेऊन सोमय्या हे मुंबई कडे रवाना झाले. 'हक्काचे आरक्षण देऊ; कुणाचेही काढणार नाही!' असून मंत्र्यांनाही चर्चेसाठी पाठविले आहे. हा मेळावा पूर्वनियोजित असल्याने तो रद्द करणे शक्य नव्हते. मात्र, इतरांचे आरक्षण कमी न करता मराठा समाजाला हक्काचे मिळावे, हीच सरकारची भूमिका आहे,' असे शिंदे यांनी स्पष्ट केले. खासदार संजय जाधव यांचे कौतुक करताना शिंदे म्हणाले की, संजय जाधव हे धाडसी खासदार असून आता ते खऱ्या अर्थाने मूळ शिवसेनेत आले आहेत. २०२२ मध्ये राज्यात खऱ्या अर्थाने उठाव झाला आणि शिवसेना भक्कम झाली. आता सहा खासदारांनी मूळ शिवसेनेत परतण्याचा निर्णय घेतला आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांची कास त्यांनी धरली आहे. विरोधात राहून विकास शक्य नाही. वैयक्तिक स्वार्थासाठी नव्हे, तर परभणीच्या जनतेच्या विकासासाठी जाधव यांनी हा निर्णय घेतल्याचा दावा शिंदे यांनी केला. मराठवाड्यात कृषीपूरक उद्योग उभे राहिले पाहिजेत. त्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा सरकार उपलब्ध करून देईल. परभणी शहराच्या विकासासाठी नवीन औद्योगिक वसाहत निर्माण करण्यात येईल आणि विकासासाठी भरीव निधी उपलब्ध करून दिला जाईल. 'विकास हाच आमचा अजेंडा असून हे सरकार बळीराजाचे आहे. आपत्तीच्या काळात शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही,' अशी ग्वाहीही शिंदे यांनी दिली. एकीकडे सत्ताधाऱ्यांकडून मराठा समाजाला हक्काचे आरक्षण देण्याची ग्वाही, तर दुसरीकडे आंदोलकांकडून काळे झेंडे आणि घोषणाबाजी; त्यामुळे परभणीतील शिंदे यांच्या सभेने मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा ढवळून निघाल्याचे चित्र पाहायला मिळाले. काळे झेंडे अन् 'एक मराठा, लाख मराठा'च्या घोषणा सभेच्या ठिकाणी मराठा आरक्षण आंदोलकांनी जोरदार निदर्शने केली. 'एक मराठा, लाख मराठा'च्या घोषणा देत मेळावा रद्द करण्याची मागणी आंदोलकांनी केली. घोषणाबाजी करणाऱ्या काही कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. शिंदे यांच्या भाषणाला सुरुवात झाल्यानंतर काही आंदोलनकर्त्यांनी काळे झेंडे दाखवत घोषणाबाजी केली. त्यावेळी शिंदे यांनी आंदोलकांना व्यासपीठाजवळ येण्याचे आवाहन केले '२४ तासांत योग्य निर्णय घेऊ' मंत्री उदय सामंत यांनीही मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर महत्त्वाचे वक्तव्य केले. मनोज जरांगे पाटील यांची उद्या किंवा परवा भेट घेणार असून पुढील २४ तासांत योग्य निर्णय घेऊ, असे सामंत यांनी सांगितले.

# भद्रा मारुती येथे तिसऱ्या श्रावणी शनिवारी लाखो भाविकांची गर्दी

## विविध फळांची सजावट ठरली भाविकांचे आकर्षण






**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील खुलताबाद (रत्नपूर )येथील जागृत व लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या तीर्थक्षेत्र भद्रा मारुती येथे तिसऱ्या श्रावणी शनिवारी लाखो भाविकांनी पवनपुत्र हनुमान की जय " "बजरंग बली की जय"""जय श्रीराम" चा जयघोष करत भद्रा मारुतीरायाचे दर्शन घेतले.तिसऱ्या श्रावणी शनिवारी भद्रा मारुतीरायाला विविध फळांची सजावट करण्यात आली होती.

श्रावणातील तिसऱ्या श्रावणी शनिवारी पहाटेच्या सुमारास भद्रा मारुती देवतेला वेदमंत्राच्या जयघोषात अभिषेक घालण्यात आला. ब्रह्मवृंद मंडळींनी शास्त्रोक्त पद्धतीने पूजन केले. यावेळी छत्रपती संभाजीनगरचे माजी खासदार व भद्रा मारुती संस्थानचे विश्वस्त चंद्रकांत खैरे, संस्थानचे सचिव मंत्री अतुल सावे, अध्यक्ष मिठूभाऊ बारगळ,उपाध्यक्ष बाबासाहेब बारगळ, कार्याध्यक्ष किशोर अग्रवाल, विश्वस्त कचरू बारगळ, भूषण अग्रवाल, खंडेराव बारगळ,संस्थानचे सुरक्षा व जनसंपर्क अधिकारी राजेंद्र जोंधळे, अर्थ कमिटीचे सदस्य योगेश अवचट, रमेश कर्पे उपस्थित होते.

मध्यरात्री रात्री १२ वाजता भाविकांना दर्शन सुरू करण्यात आले. भाविकांच्या सेवेसाठी आरोग्य सेवा, रुग्णवाहिका सेवा, पिण्याचे स्वच्छ पाणी व्यवस्था भद्रा मारुती मंदिर देवस्थानच्या वतीने करण्यात आली होती. पहाटे पासूनच भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी झाल्याने मंदिर प्रांगण भक्तांच्या गर्दीने फुलून गेले होते.

बेलपिंपळगाव येथील जनसेवा सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आकाश बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे ३५ पोलीस जनसेवा पोलीस मित्रांनी चोख बंदोबस्तासाठी मोलाची भूमिका बजावली. आलेल्या सर्व भाविकांचे भद्रा मारुती देवस्थानचे सुरक्षा अधिकारी राजेंद्र जोंधळे यांनी स्वागत केले. भाविकांना रांगेत दर्शन घेता यावे म्हणून पोलीस स्टेशन, होमगार्ड, पोलीस मित्र संघटनेच्या कर्मचाऱ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. "प्रभू रामचंद्र की जय" "पवन पुत्र हनुमान की जय "च्या गजराने मंदिर परिसरातील वातावरण भक्तिमय बनले होते.

# भालगावच्या रामेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासे :** नेवासे तालुक्यातील भालगाव येथील रामेश्वर महादेवाच्या दर्शनासाठी श्रावण महिन्याच्या प्रारंभ पासून सोमवारी व प्रत्येक दिवशी भाविकांची गर्दी होत आहे. त्यात पुरुष, महिला, युवकांची संख्या मोठी आहे.

नेवासे तालुक्यातील जुने भालगाव येथे गोदावरी नदीकाठी रामेश्वर महादेवाचे जुने हेमाडपंथी मंदिर आहे. प्रभू रामचंद्रांनी या मंदिराची स्थापना केल्याची भाविकांची भावना आहे. सुमारे १०० वर्षांपूर्वी स्व. तुकाराम हनुमंतराव तनपुरे पाटील यांनी या मंदिराचा जिर्णोद्धार केल्याचे मानले जाते. त्यांचे नावही मंदिरावर कोरलेले आहे. आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी नवीन गावठाण ते जुने गावठाण व जुने गावठाण ते रामेश्वर मंदिर या रस्त्याचे कामासाठी निधीची तरतूद केली आहे. मंदिरासाठी हायमॅक्स दिव्याची ही तरतूद त्यांनी केली आहे.

गोदावरी नदीकाठचा मंदिर परिसर अत्यंत रमनीय असून गावातील व परिसरातील युवकांनी मंदिर परिसरात वृक्षारोपण करून हा परिसर नयनरम्य बनविला आहे. प्रत्येक सोमवारी महादेवाला अभिषेक, शिवलीलामृत ग्रंथ वाचन, भाविकांसाठी फराळ, रात्री भजन संध्या असे उपक्रम येथे राबविले जातात. ब्रह्मदिन बालब्रह्मचारी महाराजांनी येथे सुरू केलेली हरिनाम सप्ताहाची परंपरा युवक व भाविकांनी अखंडितपणे सुरू ठेवली आहे.

भालगावच्या रामेश्वर महादेवाची ख्याती सर्वत्र पसरल्याने भाविक पुरुष महिला युवक सोमवारीच नाही तर प्रत्येक दिवशी दर्शनासाठी गर्दी करत आहेत.

# एसपी सुदर्शन यांच्या धसक्याने मढीतील खिसेकापू, मोबाईल चोर गायब !

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**
**शिवदास मरकड**

**तिसगाव :** तिसऱ्या श्रावण शुक्रवारनिमित्त श्रीक्षेत्र मढी व मोहटादेवी येथे लाखो भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. मात्र, पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या कडक नियोजनामुळे यंदा गर्दीचा फायदा घेणाऱ्या गुन्हेगारी प्रवृत्तींना मोठा आळा बसल्याचे चित्र दिसून आले. मढी येथे यापूर्वी रस्त्याच्या कडेला ठाण मांडून बसणारे काळे-पिवळे, सोरटवाले, खिसेकापू तसेच मोबाईल व दागिने चोरणाऱ्या टोळ्यांचा वावर दिसत असे. मात्र, यावेळी पाकीटमारी, मोबाईल चोरी अथवा महिलांच्या दागिन्यांची चोरीची घटना समोर न आल्याने भाविकांनी पोलिसांच्या बंदोबस्ताचे कौतुक केले.

### 'सुदर्शन चक्र' गुन्हेगारांसाठी कर्दनकाळ ठरणार?

**पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या कडक कारभारामुळे अवैध धंदे व गुन्हेगारी प्रवृत्तींवर पोलिसांची नजर अधिक तीव्र झाल्याची चर्चा आहे. मढी, मायंबा, वृद्धेश्वर तसेच धामणगाव घाट परिसरात भाविकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देऊन गुन्हेगारांवर अशीच करडी नजर कायम राहिल्यास धार्मिक स्थळांवरील पाकीटमारी, मोबाईल चोरी व लुटमारीला निश्चितच आळा बसेल, अशी अपेक्षा भाविक व ग्रामस्थांनी व्यक्त केली.**

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी शुक्रवारी श्रीक्षेत्र मढी तसेच श्री मोहटादेवी येथे प्रत्यक्ष भेट देऊन वाहतूक व्यवस्था आणि भाविकांच्या सुरक्षेची पाहणी केली. गर्दीच्या ठिकाणी संशयित व्यक्तींवर करडी नजर ठेवण्यासह भाविकांना कोणताही त्रास होणार नाही, यासाठी पोलिसांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. श्रीक्षेत्र मढी येथे रंगपंचमी यात्रा, अमावास्या, पौर्णिमा तसेच श्रावणातील शुक्रवार अशा विविध पर्वणीच्या काळात मोठ्या संख्येने भाविक कानिफनाथांच्या दर्शनासाठी येतात. गर्दीचा फायदा घेत भाविकांच्या खिशातील पाकिट, मोबाईल तसेच महिलांच्या गळ्यातील दागिने लंपास करण्याचे प्रकार यापूर्वी घडले आहेत. त्यामुळे यंदा पोलिसांनी विशेष खबरदारी घेतली.

चैतन्य कानिफनाथांच्या पालखी सोहळ्यासाठी शुक्रवारी मढी येथे मोठी गर्दी झाली होती. पाथर्डी पोलिसांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली गड परिसर, पालखी मार्ग आणि गर्दीच्या ठिकाणी कडक बंदोबस्त ठेवला. मढी, मायंबा, वृद्धेश्वर व मोहटादेवी येथे वर्षभर भाविकांची गर्दी असते. त्यामुळे धार्मिक स्थळांवरील सुरक्षेला सातत्याने प्राधान्य देण्याची गरज आहे.

## निधन

### काशिनाथ कदम



**भाळवणी :** येथील जुन्या पिढीतील प्रगतशील शेतकरी काशिनाथ जयवंत कदम यांचे वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. येथील प्रगतशील शेतकरी संभाजी कदम व सुभाष कदम यांचे ते वडील होत.

### नानासाहेब रोहोकले



**भाळवणी :** पारनेर पंचायत समितीचे माजी सदस्य व परिसरात 'नाना सॉ मिल' या नावाने परिचित असलेले नानासाहेब बबनराव रोहोकले यांचे अल्प आजाराने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, माजी उपसरपंच सुरेश रोहोकले, प्रकाश रोहोकले, पुतण्या अक्षय रोहोकले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## निधन

### बळीराम तानवडे



**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील पिंगेवाडी येथील रहिवाशी बळीराम निवृत्ती तानवडे (वय ४०) यांचे अल्प आजाराने निधन झाले. शेतकरी कुटुंबातील असणारे तानवडे हे संयमी विचारसरणीचे सर्वांना सोबत घेऊन चालणारे होते. त्यांच्या पश्चात वडील, पत्नी,१ मुलगा व १ मुलगी असा परिवार आहे. श्री केदारेश्वर साखर कारखान्याचे संचालक अशोक तानवडे यांचे ते बंधू तर श्री ज्ञानेश्वर साखर कारखान्याच्या संचालिका तानवडे यांचे ते दीर होत.

### शारदाताई सपकाळ



**अहिल्यानगर :** राहुरी येथील शारदाताई गुलाबराव सपकाळ (वय ८७) यांचे रविवारी (दि.३० ऑगस्ट) निधन झाले. त्या वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. भिंगार राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष व हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ यांच्या त्या चुलती होत.


**CHANGE OF THE NAME**
MY OLD NAME IS IBRAHIM ABDUL MAJID MEMON AND MY NEW NAME IS IBRAHIM MAJID MEMON


# सभासद व ठेवीदारांचा विश्वास संपादन केल्याने ठेवींमध्ये वाढ : राजेंद्र ढोमसे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** सभासद व ठेवीदारांनी संस्थेवर दाखविलेला विश्वास, संचालक मंडळाचा शिस्तबद्ध कारभार आणि कर्जवाटपातील काटेकोर धोरणामुळे श्रीदत्त दिगंबर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या ठेवींमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. संस्थेच्या एकूण ठेवी १० कोटी ४० लाख रुपये असून, ग्राहकाभिमुख व तंत्रज्ञानाधारित सेवा देण्यावर यापुढेही भर राहणार असल्याचे संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र ढोमसे यांनी सांगितले.

कोपरगाव तालुक्यातील शहाजापूर येथील श्रीदत्त दिगंबर पतसंस्थेची २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा अध्यक्ष राजेंद्र ढोमसे यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी सभासदांशी संवाद साधताना ते बोलत होते.



ढोमसे म्हणाले की, संस्थेचे भागभांडवल २५ कोटी ७२ लाख रुपये, गुंतवणूक ५ कोटी ५७ लाख रुपये, तर कर्जवाटप ५ कोटी ५६ लाख रुपये आहे. स्पर्धेच्या युगात सभासदांना विविध ऑनलाइन सेवा व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संस्था सज्ज झाली आहे. ठेवीदारांनी आयुष्याची कमाई सुरक्षिततेच्या विश्वासातून संस्थेकडे ठेवली असून, हा विश्वास यापुढेही अधिक सक्षमपणे जपला जाईल.

कर्मवीर शंकरराव काळे उद्योग समूहाचे आधारस्तंभ माजी आमदार अशोक काळे व आमदार आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाचा संस्थेच्या प्रगतीत मोठा वाटा असल्याचेही ढोमसे यांनी नमूद केले. संस्थेचा वार्षिक अहवाल व्यवस्थापक विलास हाडोळे यांनी सादर केला. विषयपत्रिकेवरील सर्व विषय सभासदांनी टाळ्यांच्या कडकडाटात मंजूर केले. यावेळी बाळासाहेब काळे, माणिकराव चंद्रे, मच्छिंद्र देशमुख, संजय सूर्यवंशी, अमोल कोळपे, विजय वर्षे, गणेश बोरसे यांच्यासह संचालक, सभासद उपस्थित होते. आभार उपाध्यक्ष विलास वाबळे यांनी मानले.

# ज्ञानसरिता विद्यालयात शालेय व किशोरवयीन आरोग्य जनजागृती

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या कॉलेज ऑफ नर्सिंगच्या समुदाय आरोग्य परिचर्या विभागातर्फे, डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल व रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल यांच्या सहकार्याने वडगाव गुप्ता येथील ज्ञानसरिता विद्यालयात शालेय आरोग्य तपासणी व किशोरवयीन आरोग्य जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करणे, प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेचे महत्त्व पटवून देणे, वैयक्तिक स्वच्छता, योग्य पोषण, निरोगी जीवनशैली आणि किशोरवयीन आरोग्याबाबत योग्य माहिती देणे हा उपक्रमाचा उद्देश होता. कार्यक्रमात विद्यार्थ्यांची सर्वसमावेशक आरोग्य तपासणी करण्यात आली. आढळलेल्या आरोग्य समस्यांबाबत विद्यार्थ्यांना आवश्यक मार्गदर्शन व समुपदेशन करण्यात आले. यावेळी मासिक पाळीचे आरोग्य व व्यवस्थापन, गुड टच-बॅड टच, स्व-स्तन तपासणी, कर्करोग प्रतिबंध व लवकर निदान, योग्य पोषण, वैयक्तिक स्वच्छता आणि निरोगी जीवनशैली याबाबत पोस्टर प्रदर्शन, प्रात्यक्षिके व जनजागृतीपर स्किटच्या माध्यमातून माहिती देण्यात आली. आरोग्य समस्या उद्भवल्यास वेळ न दवडता वैद्यकीय सल्ला घेण्याचे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमास रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलचे अध्यक्ष अमर गुरव व सीएसआर प्रमुख सुनील कटारिया उपस्थित होते. प्रा. डॉ. अभिजित दिवटे, डॉ. सतीश मोरे, डॉ. अपूर्वा देशमुख व डॉ. ऐश्वर्या तळवलकर यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य प्रा. डॉ. प्रतिभा चांदेकर, उपप्राचार्य तथा विभागप्रमुख प्रा. डॉ. योगिता औताडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य सुंबे यांचा सत्कार करण्यात आला. अमोल अनप, दिनेश मगर, प्रिती कडू व स्नेहल घोडेकर यांनी समन्वय साधला. शाळा प्रशासन व विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे उपक्रम प्रभावी ठरला.


## छोटी जाहिरात

### हॉटेल स्टाफ पाहिजेत

श्रीरामपूर - वाकडी - राहाता रोडवरील परमिट रूम आणि फॅमिली रेस्टॉरंटसाठी खालील पदांवर तातडीने कर्मचारी हवे आहेत.वेटर ४ (स्थानिक तसेच इतर राज्यातील कामगार चालतील) हेल्पर २, सफाई व भांडी धुण्यासाठी कामगार किंवा जोडपे पाहिजेत.आकर्षक आणि वेळेवर पगार व राहण्याची उत्तम सोय मोफत उपलब्ध आहेत.

**संपर्क**
**मोबाईल नंबर**
९९७५६२३६६३


### बिस्किट तोंडात कोंबण्याचा प्रयत्न; चार जणांविरोधात गुन्हा

प्राप्त झाली होती. त्यानुसार २८ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५:१५ वाजेच्या सुमारास त्यांनी सदर पानटपरीची पाहणी केली. तपासणीदरम्यान तिथे मुदतबाह्य 'पारले मोनाको बिस्किट'चे १० रुपयांचे ८ पुडे आढळून आले. अजिंठेकर यांनी हा साठा जप्त करून टपरी चालक सलीम शेख यास ३१ ऑगस्ट रोजी कार्यालयात हजर राहण्याची नोटीस दिली. गंगापूर चौफुलीवर गाठून केला प्रकार कारवाई पूर्ण करून अजिंठेकर खाजगी वाहनाने छत्रपती संभाजीनगरकडे परत निघाल्यानंतर, सायंकाळी ६:२० वाजेच्या सुमारास गंगापूर चौफुली येथे एका कारमधून आलेल्या चौघांनी त्यांचे वाहन थांबवले. तुम्ही आमच्या तक्रारीवर कोणतीही कारवाई केली नाही, असा आरोप करत त्यांनी अधिकाऱ्याशी वाद घातला. अधिकाऱ्याने कारवाईची माहिती देण्याचा प्रयत्न केला असता, संशयित आरोपी नितीन उर्फ मिथुन बहिरट, शिवा ठोंबरे, दिनकर रोठे (सर्व रा. पुरणगाव, ता. वैजापूर) आणि एका अज्ञात इसमाने कारचा दरवाजा उघडून जप्त केलेले मुदतबाह्य बिस्कीट बळजबरीने ताब्यात घेतले. तुम्ही हे बिस्किट खाऊन दाखवा, नाहीतर मारहाण करू, अशी धमकी देत मिथुन बहिरट व त्याच्या साथीदारांनी अधिकाऱ्याच्या तोंडात जबरदस्तीने मुदतबाह्य बिस्किट कोंबण्याचा प्रयत्न केला. व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर गुन्हा दाखल या प्रकारानंतर परिसरात मोठी गर्दी जमली होती. अजिंठेकर यांनी फोनवरून माहिती दिल्यानंतर पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन अधिकाऱ्याची सुटका केली. घटनेच्या वेळी झालेल्या प्रकाराचे काही व्हिडीओ सोशल मीडियावर आणि वृत्तवाहिन्यांवर व्हायरल झाले होते. अजिंठेकर यांनी वरिष्ठांना घटनेची सविस्तर माहिती दिल्यानंतर, त्यांच्या निर्देशानुसार २९ ऑगस्ट रोजी वैजापूर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवण्यात आली. पोलिसांनी चौघांविरोधात शासकीय कामात अडथळा निर्माण करणे, मारहाणीची धमकी देणे आणि जप्त केलेला पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

### अहिल्यानगर, कर्जत व राहुरी तालुक्यातून सहा लाखांचा मुद्देमाल जप्त

पेव फुटले असून सर्वत्र राजरोसपणे त्याची विक्री सुरू आहे. या संदर्भात थेट कारवाई करण्याचे आदेश जिल्हा पोलीस प्रमुख सुदर्शन यांनी स्थानिक पोलीस ठाण्यांना दिले आहेत दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी या कारवाईसाठी चार विविध पोलीस पथके तैनात केली आहेत. त्यामध्ये पोलीस अंमलदार संदीप पवार, विजय ठोंबरे, अतुल लोटके, शाहीद शेख, बिरप्पा करमल, विकास साळवे, अमृत आढाव, सागर ससाणे, अरूण गांगुर्डे, दिपक जाधव, प्रकाश मांडगे, भाऊसाहेब काळे, मनोज साखरे, रोहित मिसाळ, गणेश लोंढे, निळकंठ कारखेले, संतोष खैरे, रमीजराजा आत्तार, सतीष भवर, अमोल आजबे अशांचे चार पथक तयार करून जिल्हयातील अवैध गुटखा, मावा व सुगंधीत तंबाखु व्यावसायिकांची माहिती काढुन, कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार या चारही पथकांनी अहिल्यानगर शहरासह कर्जत व राहुल शहरात तालुक्यात विविध ठिकाणी शनिवारी एकाच दिवशी सहा ठिकाणी छापे टाकले. या पथकाने सहा ठिकाणी छापे टाकून १५ आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत या छाप्यात सुमारे पाच लाख ९५ हजार ९१५ किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुमारे एक लाख वीस हजार सहाशे रुपयांचा मुद्देमाल हसगत करण्यात आला आहे. यावेळी एमआयडीसी पोलीस ठाण्यात सचिन बबन डोंगरे (रा.माजी सैनीक चौक, वडगाव गुप्ता, ता.जि.अहिल्यानगर), कय्यमु शेख (रा.मुकूंदनगर, अहिल्यानगर (फरार) सतीष सुखदेव तोडमल (रा. नागापूर, ता.जि.अहिल्यानगर),अजझर पठाण ( रा. मुकूंदनगर, ता.अहिल्यानगर (फरार), भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात ज्ञानेश्वर रमेश गायकवाड ( रा. विळदघाट, एमआयडीसी, ता.अहिल्यानगर),अमर शिवाजी ताठे (रा.सहयाद्री चौक, नवनागापूर, ता.अहिल्यानगर),ऋषी काटकर (.बीड (फरार)शाफीन आरीफ शेख (रा.मुकूंदनगर, ता.अहिल्यानगर), अल्तमश सय्यद ( रा.झेंडीगेट, अहिल्यानगर (फरार) यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले असून सुमारे चार लाखाचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीत गोविंद काळुराम जाधव (रा. खेड, ता.कर्जत), धीरज कवितके ( रा.भिगवण, ता.इंदापूर, जि.पुणे (फरार), उमर अस्लम शेख ( रा. खेड, ता.कर्जत) अभि कवितके (रा.भिगवण, ता. इंदापूर, जि.पुणे (फरार) यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत त्याचप्रमाणे राहुरी पोलीस ठाण्यात शोएब महमंद शेख (रा.डिग्रस, ता.राहुरी), फारूक पठाण (रा. सोनई, ता.नेवासा (फरार) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

**सोमवार दि. ३१ ऑगस्ट २०२६**

**मिलनम डे**
उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| १२६<br>४६९<br>९०० | ९-५ | २३०<br>२०८<br>७८० | ७९-३९-४५-५७-८१ |

**कल्याण**
उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| २४०<br>२६८<br>३३० | ६-८ | १२५<br>२६०<br>४४० | १६-६४-२८-८०-५४ |

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| ३४५<br>३९२<br>२०० | २-० | १९०<br>२८०<br>२४४ | ६२-२१-९०-०८-५३ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## द • ख • ल

### मुख्याध्यापिका मीना पवार यांचा 'आदर्श शिक्षिका' पुरस्काराने गौरव



**अहिल्यानगर :** शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान देणाऱ्या श्रीमती मीना पवार यांना राज्यस्तरीय 'आदर्श शिक्षिका' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जन आरोग्यम, जाणीव फाउंडेशन संगमनेर, संचार निगम पेन्शनर्स वेलफेअर असोसिएशन आणि अमृत उद्योग समूह यांच्या वतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. नाशिक पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजितदादा तांबे यांच्या हस्ते मीना पवार यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. खांडगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या पुरस्कार सोहळ्यात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत हा गौरव करण्यात आला. श्रीमती मीना पवार यांनी शैक्षणिक क्षेत्रात केलेले उल्लेखनीय कार्य, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेसोबतच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविलेले विविध उपक्रम तसेच सामाजिक बांधिलकी जपत केलेल्या कार्याची दखल घेत त्यांना या राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले. त्या अहमदनगर एज्युकेशन सोसायटी प्राथमिक शाळा वाबोरी येथे मुख्याध्यापिका म्हणून कार्यरत आहेत.



### 'अन्नपूर्णा आजी' म्हणून मीरा आव्हाड यांचा पीपल्स हेल्पलाईनच्यावतीने गौरव

**अहिल्यानगर :** शिक्षणासाठी घरापासून दूर येणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अल्पदरात पौष्टिक, चवदार आणि घरगुती भोजन उपलब्ध करून देत त्यांच्या शिक्षणप्रवासाला मायेचा आधार देणाऱ्या मीरा भगवान आव्हाड यांच्या सेवाभावी कार्याचा पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने गौरव करण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आयोजित करण्यात आलेल्या 'तिरंगा राष्ट्रीय धारणालय' कार्यक्रमात त्यांना 'अहिल्यानगरची अन्नपूर्णा आजी' या सन्मानाने गौरविण्यात आले. साडी व फेटा देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मीरा आव्हाड यांनी आपल्या सेवेमागील भावना व्यक्त केली. गरिबीमुळे माझ्या मुलाला उच्च शिक्षण घेताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. शिक्षणासाठी घरापासून दूर राहणाऱ्या कोणत्याही विद्यार्थ्याला उपासमार किंवा कुपोषण सहन करावे लागू नये, हीच माझी भावना आहे, असे त्यांनी सांगितले. यावेळी ॲड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, प्रकाश थोरात, ॲड. अमित थोरात, वीर बहादूर प्रजापती, शाहीर कान्हू सुंबे, बाळासाहेब पालवे, हनुमंतराव साळवे, आनंदा आढाव, अभिमान शिंदे, चतुराबाई शिंदे, रमेश भोसले आदी उपस्थित होते.



### विद्यार्थ्यांच्या सेवेसाठी एअर कॉम्प्रेसर भेट

**कासार पिंपळगाव :** पाथर्डी तालुक्यातील कासार पिंपळगाव येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय येथे आपल्या मातृसंस्थेप्रती असलेली कृतज्ञता व्यक्त करत माजी विद्यार्थ्यांनी एक अनुकरणीय सामाजिक उपक्रम राबविला आहे.शाळेत शिक्षण घेणारे अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनी दररोज सायकलवरून ये-जा करतात. सायकलमध्ये हवा कमी झाल्यास गावात तत्काळ हवा भरण्याची सुविधा नसल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना सायकल लोटत घरी जावे लागत होते. विद्यार्थ्यांची ही अडचण लक्षात घेऊन माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येत वर्गणी गोळा करून शाळेला नवीन एअर कॉम्प्रेसर मशीन भेट दिले.हा उपक्रम केवळ एक मशीन भेट देण्यापुरता मर्यादित नसून, आपल्या शाळेप्रती असलेले प्रेम, विद्यार्थ्यांप्रती असलेली आपुलकी आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी यांचे जिवंत उदाहरण आहे. या सुविधेमुळे भविष्यात शेकडो विद्यार्थ्यांची गैरसोय दूर होणार असून त्यांचा वेळ, श्रम आणि आर्थिक खर्च वाचणार आहे.या उपक्रमासाठी योगदान देणारे माजी विद्यार्थी गणेश भगत, आप्पासाहेब राजळे, गणेश शेरकर, संतोष शेळके, आदिनाथ शाहूराव राजळे, मंगेश भगत, दादासाहेब पवार (मेजर), सचिन शेळके, डॉ. संदीप दगडखैर, राजेंद्र बर्डे, रवींद्र बर्डे तसेच या उपक्रमासाठी मुरलीधर भगत त्यांचे मार्गदर्शन लाभले.

### युनूस तांबटकर यांचा अर्ज धर्मादाय सहआयुक्तांकडून रद्द

**अहिल्यानगर :** नागोरी मुस्लीम मिसगर जमाअत ट्रस्ट एफ-१७च्या कार्यकारणीबाबत पुणे येथील मा. धर्मादाय सहआयुक्तांकडे महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त कायदा १९५० मधील कलम ४७ अन्वये युनूस तांबटकर यांनी दाखल केलेला अर्ज क्र. ६०/२०१६ अखेर रद्द करण्यात आला आहे. दोन्ही पक्षांचे युक्तिवाद ऐकून तसेच सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांची व पुराव्यांची पडताळणी केल्यानंतर धर्मादाय सहआयुक्तांनी हा अर्ज रद्द केल्याची माहिती ट्रस्टचे जनरल सेक्रेटरी रेहान शफी अहमद काझी यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत दिली.

युनुस सुलतान तांबटकर व इतरांनी सन २०१६ मध्ये पुणे येथील धर्मादाय सहआयुक्तांकडे कलम ४७ अन्वये नागोरी मुस्लीम मिसगर जमाअत ट्रस्टवर पाच वर्षांच्या कालावधीसाठी नेमणूक करण्याबाबत अर्ज दाखल केला होता. या अर्जाला तत्कालीन विश्वस्त तथा ट्रस्टचे माजी जनरल सेक्रेटरी तनवीर मुनीर खान व ॲड. जावेद खुदाबक्ष काझी यांनी कलम ७३-अ अन्वये हरकत घेतली होती. सन २०२२ मध्ये नागोरी मुस्लीम मिसगर जमाअत ट्रस्टची निवडणूक झाल्यानंतर त्यासंदर्भातील बदल अर्ज क्र. ७३२/२०२२ अहमदनगर येथील धर्मादाय उपआयुक्तांच्या कार्यालयात दाखल करण्यात आला आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असतानाच कलम ४७ अन्वये दाखल केलेल्या अर्जावर पुणे येथील धर्मादाय सहआयुक्तांसमोर सुनावणी झाली. दि.६ ऑगस्ट २०२६ रोजी दोन्ही पक्षांचे युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर उपलब्ध कागदपत्रे व त्यातील नोंदींचे अवलोकन करून धर्मादाय सहआयुक्तांनी अर्ज क्र. ६०/२०१६ रद्द केला. तसेच रेहान शफी काझी यांनी दाखल केलेला बदल अर्ज क्र. ७३२/२०२२ पुढील सहा महिन्यांत निकाली काढण्याचे आदेश दिल्याचे रेहान काझी यांनी स्पष्ट केले. यावेळी रेहान काझी यांनी युनूस तांबटकर व त्यांच्या नातेवाईकांकडून ट्रस्टच्या कारभारात हस्तक्षेप केल्याचा आरोप केला. ट्रस्टच्या मिळकतीमध्ये अनधिकृत बांधकाम करून गाळे उभारणे, त्यातून मोठ्या प्रमाणात रक्कम जमा करून तिचा स्वतःच्या फायद्यासाठी वापर करणे, अवैध भाडे वसुली करणे, ट्रस्टच्या भाडेकरूंना अधिकार नसताना नोटिसा पाठवून पैशांची मागणी करणे, तसेच ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांविरुद्ध खोटे व बनावट गुन्हे दाखल करणे, असे आरोप त्यांनी केले.यावेळी ॲड. वसीम गुलाम सय्यद, ॲड. नवाज खान उमरखान पठाण, विश्वस्त इनाम उल्ला खान, वाजिद खान व इफ्तेखार खान उपस्थित होते.

# वर्षानुवर्षे रखडलेल्या वंजार गल्लीतील रस्त्याला अखेर मुहूर्त

## नगरसेवक सागर मुर्तडकर यांच्या प्रयत्नातून काँक्रिटीकरणाच्या कामाला सुरुवात

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** शहरातील प्रभाग क्रमांक १० मधील वंजार गल्ली परिसरातील वर्षानुवर्षे रखडलेल्या रस्त्याच्या प्रश्नाला अखेर गती मिळाली आहे. नागरिकांच्या दैनंदिन अडचणींचा विचार करून नगरसेवक सागर मुर्तडकर यांच्या प्रयत्नातून या रस्त्याच्या काँक्रिटीकरणाच्या कामाला सुरुवात करण्यात आली. भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांच्या हस्ते या कामाचे उद्घाटन करण्यात आले. रस्त्याचे काम सुरू झाल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

वंजार गल्ली परिसरातील रस्त्याची अनेक वर्षांपासून दुरवस्था झाली होती. रस्त्याच्या समस्येमुळे नागरिकांना दैनंदिन ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत होता. विशेषतः पावसाळ्यात रस्त्याची अवस्था अधिक बिकट होत असल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. या पार्श्वभूमीवर रस्त्याचे काँक्रिटीकरण व्हावे, अशी नागरिकांची मागणी होती. नगरसेवक सागर मुर्तडकर यांनी या प्रश्नाचा पाठपुरावा करून अखेर रस्त्याच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली.

या कामाच्या उद्घाटन सोहळ्यास उपमहापौर धनंजय जाधव, नगरसेवक सागर मुर्तडकर, नगरसेविका मयुरीताई जाधव, नगरसेविका शीतलताई ढोणे, संजय ढोणे, भाजप नेते बाबासाहेब सानप, सूरज जाधव, कुस्ती संघटनेचे वैभव लांडगे, श्रीकांत फंड, निलेश खांडरे, शुभम गंगेकर, सचिन दिवटे, ज्ञानेश्वर ढापसे, जगन्नाथ शेट बजाज, बिहानी शेठ, भाजपचे ज्येष्ठ नेते अनिल गट्टानी, गणेश शेठ कांबळे, शरद मुर्तडकर, विनाताई ढापसे, उमेश काळे, गणेश भाऊ भिंगारदिवे, हरिभाऊ जुम्मेवाले यांच्यासह प्रभागातील अनेक मान्यवर, पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

उपमहापौर धनंजय जाधव म्हणाले की, प्रभाग क्रमांक १० मध्ये भाजपचे तीन नगरसेवक बहुमताने निवडून आल्यानंतर परिसरातील विकासकामांना वेग आला आहे. वंजार गल्लीसह प्रभागातील अनेक भागांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून विविध विकासकामे प्रलंबित होती. मात्र, सागर मुर्तडकर नगरसेवक झाल्यानंतर नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू झाले आहेत.

अनेक वर्षांपासून विकासापासून वंचित असलेल्या भागाला आता सागर मुर्तडकर यांच्या माध्यमातून विकासाची गती मिळत आहे. प्रभागातील प्रलंबित प्रश्न टप्प्याटप्प्याने मार्गी लावले जातील, असा विश्वास धनंजय जाधव यांनी व्यक्त केला. वंजार गल्लीतील रस्त्याच्या काँक्रिटीकरणामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. रस्ता सुस्थितीत झाल्यानंतर नागरिकांची दैनंदिन वाहतूक अधिक सुलभ होणार असून, ये-जा करताना होणाऱ्या अडचणी कमी होतील. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या कामाला सुरुवात झाल्याने नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल असल्याचेही त्यांनी सांगितले.

नगरसेवक सागर मुर्तडकर यांच्या प्रयत्नातून रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम सुरू झाल्याने परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. नागरिकांच्या मूलभूत गरजा आणि प्रभागातील प्रलंबित विकासकामांना प्राधान्य देऊन कामे मार्गी लावण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

प्रभाग क्रमांक १० मधील विविध भागांमध्ये रस्ते, पायाभूत सुविधा आणि नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित प्रश्न सोडविण्याची गरज असून, उपलब्ध निधी व प्रशासकीय प्रक्रियेनुसार विकासकामांना गती देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. वंजार गल्लीतील रस्त्याचे काँक्रिटीकरण हे त्याचाच एक भाग मानला जात आहे. रस्त्याच्या कामाला सुरुवात झाल्याने परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, रखडलेल्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाल्याबद्दल नागरिकांनी नगरसेवक सागर मुर्तडकर यांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमास भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते, स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निघोज चोरीच्या तपासासाठी प्रयत्नशील: पो.नि. दिवटे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**निघोज :** राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीच्या मंदीरातील चोरीचा तपास लवकरात लवकर लावण्यासाठी पारनेर पोलिस सक्षम असल्याची ग्वाही पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांनी दिली. सोमवार दि.३१ ऑगस्ट रोजी रास्तारोको व गावबंद आंदोलन, पारनेर पोलीसांचा निषेध याचा मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट, निघोज ग्रामस्थ पत्रकार संघ, व्यापारी असोसिएशन यांनी इशारा दिला होता.

११ दिवसांपूर्वी जगप्रसिद्ध रांजणखळगे परिसरातील मळगंगा देवीच्या मंदिरातील दाणपेटी फोडून चोरट्यांनी ५४ हजार रुपयांचा ऐवज लूटून नेला होता. विशेष म्हणजे चोरटे चोरी करताना सीसीटीव्ही फुटेजमध्ये स्पष्टपणे दिसत होते असे असताना पारनेर पोलीसांनी मात्र अकार्यक्षमपणे काम करीत अकरा दिवस होऊनही चोरीचा तपास न करता टंगळमंगळ करीत असल्याचा आरोप करीत गावकऱ्यांनी निवेदने देऊन दि.३१ ऑगस्टला गाव बंद व एस टी बस स्थानक परिसरात रास्ता रोको आंदोलनाचा इशारा दिला होता.

दरम्यान पो.नि. दिवटे यांनी आंदोलनकर्त्यांशी चर्चा करून येत्या १५ दिवसात तपास करण्याचे आश्वासन दिले. यावेळी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे अध्यक्ष वसंत कवाद, उपाध्यक्ष अमृताशेठ रसाळ, सचिव शांताराम कळसकर, संघटक मंगेश वराळ, माजी सरपंच ठकारामशेठ लंके, आपली माती आपली माणसं या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रुपेश ढवण, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष बबनराव तनपुरे, सचिव शुभम गाडीलकर, विश्वस्त संतोषशेठ रसाळ, शंकरराव लामखडे, ॲड. ज्ञानेश्वर लामखडे, रमेश ढवळे, अनिल लंके, अशोकराव वरखडे, बबनराव ससाणे, विश्वस्ता आशाताई वरखडे, व्यापारी असोसिएशनचे पदाधिकारी मोहन कवाद, दत्ता चौधरी व्यवस्थापक महेश ढवळे आदी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# १ सप्टेंबर रोजी अहिल्यानगरमध्ये धडकणार 'भव्य मूक मोर्चा'

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** संपूर्ण महाराष्ट्रात ग्रामपंचायत अधिकारी कर्तव्यावर असताना त्यांच्यावर होणारे हल्ले व त्यांच्या सुरक्षितेचा गंभीर प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रभर एकाच दिवशी मंगळवार दिनांक १ सप्टेंबर रोजी प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मूक मोर्चा करण्याचे नियोजन महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन डी.एन.ई १३६ कडून करण्यात आले आहे.

जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातील मौजे शिवरे दिगर ग्रामपंचायतीत कर्तव्य बजावत असताना नियोजित ग्रामसभा सुरू असताना ग्रामपंचायत अधिकारी पी. एन. पाटील यांच्यावर झालेल्या अमानुष हल्ल्यामुळे व प्रचंड मानसिक त्रासा मुळे त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि त्यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रातील ग्रामपंचायत अधिकारी संवर्गामध्ये तीव्र संताप व भीतीचे वातावरण पसरले आहे.या धक्कादायक घटनेच्या निषेधार्थ आणि ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या सुरक्षिततेच्या विविध मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन डी.एन.ई १३६ राज्य कार्यकारिणीच्या आदेशानुसार संपूर्ण महाराष्ट्रासह अहिल्यानगर जिल्ह्यातील ग्रामपंचायत अधिकारी संवर्गाच्या वतीने १ सप्टेंबर रोजी अहिल्यानगर येथे भव्य मूक मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

# प्रथम राष्ट्र, द्वितीय पक्ष आणि नंतर आपण, या भावनेतून तळागाळात काम करा : चव्हाण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** महाराष्ट्र सरकारच्या माध्यमातून गोरगरीब, कष्टकरी, शेतकरी, महिला तसेच समाजातील तळागाळातील घटकांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांची माहिती सामान्य जनतेपर्यंत पोहोचवून त्यांना प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्याचे काम महिला कार्यकर्त्यांनी हाती घ्यावे. त्याचबरोबर जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करून पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी सातत्याने जनसंपर्क ठेवावा, असे आवाहन भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या प्रदेश सचिव तथा अहिल्यानगर जिल्हा प्रभारी सौ. वैशाली चव्हाण यांनी केले.

भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश महिला मोर्चाच्या अध्यक्षा सौ चित्राताई वाघ यांच्या मार्गदर्शना खाली अहिल्यानगर येथील भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयात महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष सौ. प्रिया जानवे होत्या. यावेळी सावेडी मंडल, केडगाव मंडल सरचिटणीस कल्याणी ठुबे भिंगार मंडल अध्यक्षा सौ ज्योत्स्ना मुंगी तसेच मध्य मंडल अध्यक्षा सो सुरेखा जंगम या चारही मंडलांचे संघटनात्मक बैठक घेण्यात आली.व पदाधिकाऱ्यांकडून कामाची माहिती जाणून घेण्यात आली.

प्रारंभी सौ. स्वाती सिरसुल यांनी जिल्हा प्रभारी सौ. वैशाली चव्हाण यांचा परिचय करून दिला. यावेळी जिल्हाध्यक्ष सौ. प्रिया जानवे, उपाध्यक्ष सौ. स्वाती पवळे, उपाध्यक्षा सौ. नीता गायकवाड, सरचिटणीस सौ. ज्योती दांडगे , सौ संध्या पावसे , सौ सुजाता औटी , प्रज्ञा जोशी , प्रतीक्षा रसाळ , पल्लवी जाधव , रेखा मैड , उज्वला भांगे , पूजा आहेर नीता गायकवाड , सुनंदा गंजी , राखी आहेर , इ.महिला पदाधिकारी आणि कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

महिलांसाठी प्रस्तावित आरक्षणाच्या प्रक्रियेत विरोधकांकडून अडथळे निर्माण करण्याचे प्रयत्न होत असल्याचा आरोप करत, अशा प्रयत्नांना हाणून पाडण्यासाठी महिला कार्यकर्त्यांनी घरी न बसता सातत्याने जनतेत जाऊन संपर्क वाढवावा आणि पक्ष संघटना अधिक मजबूत करावी, असे आवाहन सौ. वैशाली चव्हाण यांनी शेवटी केले.

### प्रा. सुहास तोरडमल यांना पीएच.डी. प्रदान



**अहिल्यानगर :** येथील न्यू लॉ कॉलेजचे प्रा. सुहास तोरडमल यांना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्याकडून कायदेविषयक क्षेत्रात पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. 'फौजदारी न्यायव्यवस्थेत अभियोजन पक्षाची महत्त्वपूर्ण भूमिका आणि महत्त्वाचे कार्य - एक विश्लेषणात्मक अभ्यास' या विषयावर त्यांनी सखोल संशोधनाबद्दल पीएच.डी. प्रदान करण्यात आली आहे.फौजदारी न्यायव्यवस्थेतील अभियोजनाची महत्त्वपूर्ण भूमिका, सार्वजनिक अभियोक्त्यांची कार्ये व जबाबदाऱ्या, न्यायप्रक्रियेत अभियोजनाचे योगदान तसेच प्रभावी, निष्पक्ष आणि न्याय्य फौजदारी न्यायव्यवस्था निर्माण करण्यासाठी आवश्यक असलेल्या सुधारणांचा या संशोधनातून मांडण्यात आले आहे. अभियोजन यंत्रणेच्या कार्यक्षमतेसमोरील विविध आव्हानेही संशोधनात मांडण्यात आले आहे.

# डेंगूमुक्त अहिल्यानगर अभियानात न्यू इंग्लिश स्कूलमध्ये जनजागृती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** पावसाळा सुरू झाला की साथीच्या आजारांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता असते. या पार्श्वभूमीवर आयुक्त यशवंत डांगे यांच्या संकल्पनेतून गेल्या तीन वर्षांपासून 'डेंगूमुक्त अहिल्यानगर' अभियान राबविण्यात येत असून, या अभियानाच्या माध्यमातून डेंगू आजारावर नियंत्रण मिळवण्यात महापालिकेला यश आले आहे.

डेंगूमुक्त अहिल्यानगर साप्ताहिक उपक्रमाच्या पाचव्या आठवड्यानिमित्त अ.नगर एज्युकेशन सोसायटीच्या रूपीबाई मोतीलालजी बोरा न्यू इंग्लिश स्कूल येथे डेंगू आजाराबाबत जनजागृती कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून डेंगू आजारापासून बचाव करण्यासाठी घ्यावयाची काळजी तसेच आवश्यक उपाययोजनांबाबत जनजागृती करण्यात आली.

कार्यक्रमास आयुक्त यशवंत डांगे, माजी महापौर सुरेखाताई कदम, नगरसेवक दत्तात्रय कावरे, नगरसेविका मंगलताई लोखंडे, प्राचार्य रवी किरण भांड, उपप्राचार्य विष्णू गिरी, पर्यवेक्षक अरविंद आचार्य, प्रभाग अधिकारी राकेश कोतकर, डॉक्टर सिमरन वधुवा, डॉक्टर सृष्टी बनसोडे, डॉक्टर स्मिता म्हस्के, डॉक्टर अमोल जाधव, प्रवीण साबळे, सुरेंद्र चोपडा, केशव देशपांडे, किशोर महानूर, वर्षा कुलकर्णी आदींसह पालक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉक्टर सृष्टी बनसोडे यांनी केले. सूत्रसंचालन किशोर महानूर यांनी केले, तर आभार प्रदर्शन वर्षा कुलकर्णी यांनी मानले.

यावेळी हिवताप कार्यालयातील कर्मचारी गोरक्ष कर्डिले, गणेश पालवे, विजय नेटके, राजेंद्र गणबोटे, दत्ता सातपुते उपस्थित होते.

# भाई सथ्था नाईट स्कूलच्या 'शिक्षणदूत' अभियानाने १६८ विद्यार्थी पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात !

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर:** विविध कारणांमुळे अर्धवट शिक्षण सोडलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी हिंद सेवा मंडळाच्या भाई सथ्था नाईट हायस्कूल व जुनिअर कॉलेजच्यावतीने राबविण्यात आलेल्या 'शिक्षणदूत' अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या अभियानांतर्गत शाळाबाह्य तसेच अर्धवट शिक्षण सोडलेल्या तब्बल १६८ विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांनी ४९, तर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी ११९ विद्यार्थ्यांना प्रवेशित केले. या उल्लेखनीय कार्याची दखल घेत सर्वाधिक विद्यार्थी प्रवेशित करणाऱ्या विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला.

दरम्यान, मुंबई येथील मासुम संस्थेने केलेल्या सर्व्हेनुसार भाई सथ्था नाईट हायस्कूल ही सर्वाधिक विद्यार्थीसंख्या असलेली राज्यातील क्रमांक एकची शाळा ठरली असल्याचे यावेळी सांगण्यात आले. रात्रशाळेत शिक्षण घेण्यासाठी विविध भागांतून विद्यार्थी येत असून, काम, व्यवसाय तसेच अन्य कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही शाळा शिक्षणाची महत्त्वपूर्ण संधी ठरत आहे.

या पार्श्वभूमीवर हिंद सेवा मंडळाचे नूतन अध्यक्ष ॲड. अनंत फडणीस यांच्या अध्यक्षतेखाली विशेष गौरव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षणाधिकारी (योजना) बाळासाहेब बुगे, भाई सथ्था नाईट हायस्कूलचे चेअरमन डॉ. पारस कोठारी, संस्थेचे उपाध्यक्ष व शालेय समिती सदस्य विलास बडवे, संस्थेचे जेष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, प्राचार्य सुनील सुसरे आदींसह शालेय शिक्षक, आजी-माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविक रात्रशाळेचे चेअरमन डॉ. पारस कोठारी यांनी केले. शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे, ॲड. अनंत फडणीस, अजित बोरा आदींनी मनोगत व्यक्त केले.

'शिक्षणदूत' अभियानांतर्गत सर्वाधिक विद्यार्थी प्रवेशित करण्याची स्पर्धा आजी-माजी विद्यार्थी गट तसेच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी गट अशा दोन गटांत घेण्यात आली होती. यामध्ये शिक्षक गटातून प्रथम क्रमांक शिवप्रसाद शिंदे, द्वितीय क्रमांक शरद पवार, तर तृतीय क्रमांक अमोल कदम यांनी मिळविला.

विद्यार्थी गटातून प्रथम क्रमांक माई फाजगे-खरे व प्रदीप भोसले, द्वितीय क्रमांक ज्योती गायकवाड ( पगारे), अनिल दिवे, आरती लबडे (गावडे) शितल पन्हाळे ( घोडके), तर तृतीय क्रमांक दीपक वाघमारे यांनी मिळविला. सर्व विजेत्यांना पाहुण्यांच्या हस्ते सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमात रात्रशाळेत शिक्षण घेणाऱ्या त्रिशला सरवदे, माई फाजगे, सारिका गुजेट्टी, अमित भोज, अनिल दिवे या विद्यार्थ्यांनी आपले अनुभवही व्यक्त केले. परिचय महादेव राऊत यांनी तर. स्वागत प्राचार्य सुनील सुसरे यांनी केले. सूत्रसंचालन वृषाली साताळकर यांनी तर आभार मंगेश भुते यांनी मानले.

# गार गावात कोल्ह्याचा धुमाकूळ; कोंबड्या फस्त

## कोल्ह्याचा बंदोबस्त करण्याची ग्रामस्थांची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

केडगाव, दौंड : तालुक्यातील गार गाव परिसरात कोल्ह्याचा उपद्रव वाढला असून, रात्री-अपरात्री खुराड्यातील कोंबड्यांवर हल्ला करून त्या फस्त केल्या जात आहेत. त्यामुळे ग्रामस्थ व शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वन विभागाने तातडीने कोल्ह्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

गार येथील अनिल चव्हाण यांच्यासह इतर नागरिकांच्या पाळीव खुराड्यातील कोंबड्या कोल्ह्याने ठार करून खाल्ल्याच्या घटना घडल्या आहेत. याबाबत वन कर्मचाऱ्यांना तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल काळे यांना वेळोवेळी लेखी व भ्रमणध्वनीद्वारे माहिती देण्यात आली. मात्र, अद्याप ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

विशेष म्हणजे गाव परिसरात दिवसा देखील कोल्ह्याचे दर्शन होत असल्याने नागरिकांमध्ये अधिक भीती निर्माण झाली आहे. ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांच्या दिशेने कोल्ह्याने हल्ल्याचा प्रयत्न केल्याच्या घटनाही घडल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्यामुळे भविष्यात नागरिक अथवा लहान मुलांना गंभीर दुखापत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.तक्रारीनंतरही वन विभागाकडून दखल घेतली जात नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून, वन कर्मचारी व अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता प्रतिसाद मिळत नसल्याचेही त्यांनी सांगितले. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने वन विभागाने तातडीने उपाययोजना करून कोल्ह्याचा बंदोबस्त करावा, तसेच पाळीव प्राण्यांचे होणारे नुकसान थांबवावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.




गार परिसरात दिवसा कुत्र्यांसोबत फिरताना दिसलेला कोल्हा. दुसऱ्या छायाचित्रात कोल्ह्याच्या हल्ल्यात खुराड्यात मृतावस्थेत आढळलेल्या कोंबड्या.

## दखल



माऊली रिसॉर्ट येथे आयोजित स्नेहमेळाव्यात सहभागी झालेले बँक ऑफ इंडियाचे सेवानिवृत्त कर्मचारी.

### सेवानिवृत्त बँक कर्मचाऱ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

**माळशिरस :** बँकिंग सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा स्नेहमेळावा सासवड-कोंढवा रस्त्यावरील माऊली रिसॉर्ट येथे उत्साहात पार पडला. बँक ऑफ इंडियाच्या सासवड व पिसर्वे शाखेतील सुमारे १७ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी या मेळाव्यात सहभाग घेतला. महिला माजी कर्मचारीही उत्स्फूर्तपणे सहभागी झाल्या.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला बँकेतील दिवंगत सहकाऱ्यांना श्रद्धांजली अर्पण करून त्यांचे स्मरण करण्यात आले. काळुराम घारे यांच्या पंचाहत्तरी निमित्त सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी त्यांच्या कार्यकाळातील आठवणी सांगत शुभेच्छा दिल्या. बँकिंग सेवेत काम करताना आलेले विविध अनुभव, आठवणी, गाणी व कविता यामुळे मेळाव्याला विशेष रंगत आली. तसेच रिसॉर्टमधील रेनडान्स, तलावात पोहणे आणि विविध साहसी खेळांचा उपस्थितांनी वयाची पर्वा न करता मनसोक्त आनंद घेतला. स्नेहभोजनाने या आनंदात आणखी भर पडली.बिपीन पाटील, उल्हास आढाव आणि मंजुश्री निरगुडे यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. हेमंत ताकवले यांनी सूत्रसंचालन केले. मेळाव्याचे नियोजन रमेश कानडे यांनी केले व उपस्थितांचे स्वागत केले. वंदे मातरम्ने कार्यक्रमाची सांगता झाली. लता बालवे, सारंगी राऊत, संगीता थोरात, विलास मोकाशी, दत्तात्रय शेटे, प्रदीप जगताप, बंडु चोरघे, सुनील रासकर, लक्ष्मण सावंत, दिलीप गिते, संजय कांबळे यांच्यासह सेवानिवृत्त बँक कर्मचाऱ्यांनी दैनंदिन व्याप विसरून एक दिवस आनंदात घालवला. पुढील काळात चार-दोन महिन्यांनी अशाच प्रकारे स्नेहमेळावा घेण्याचा मनोदय उपस्थितांनी व्यक्त केला.

### मु.सा. काकडे महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात

**सोमेश्वरनगर :** बारामती तालुक्यातील सोमेश्वरनगर येथील मु.सा. काकडे महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विविध क्रीडा स्पर्धांचे उत्साहात आयोजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे यांच्या हस्ते हॉकीचे महान खेळाडू मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात झाली.

यावेळी प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे यांनी मेजर ध्यानचंद यांच्या क्रीडा क्षेत्रातील योगदानासह देशाप्रती असलेल्या निष्ठा व देशभक्तीविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन देशाचे व महाविद्यालयाचे नाव राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल करावे, असे आवाहन त्यांनी केले. क्रीडा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, शारीरिक तंदुरुस्ती, कष्ट करण्याची सवय, संघभावना आणि पराभवातून पुन्हा उभे राहण्याची जिद्द निर्माण होते, असेही त्यांनी सांगितले. या स्पर्धांमध्ये ३५० हून अधिक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. प्रास्ताविक शारीरिक शिक्षण संचालक प्रा. डॉ. बाळासाहेब मरगजे यांनी केले. महाविद्यालयाचे अध्यक्ष सतीश लराव काकडे-देशमुख, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभिजीत काकडे-देशमुख आणि संस्थेचे सचिव सतीश लकडे यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.दि. २७ ते २९ या कालावधीत झालेल्या स्पर्धांमध्ये व्हॉलीबॉल, खो-खो, कबड्डी, क्रिकेट यांसारख्या सांघिक खेळांसह १०० मीटर, ४०० मीटर व ५००० मीटर धावणे या मैदानी स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच रस्सीखेच, दोरी उड्या, प्लँक चॅलेंज व पुश-अप्स आदी मनोरंजनात्मक व इनडोअर स्पर्धाही घेण्यात आल्या.सांघिक स्पर्धांमध्ये कला शाखेने विजेतपद मिळवत ध्यानचंद ट्रॉफीवर आपले नाव कोरले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी एनसीसी विभागप्रमुख प्रा. डॉ. श्रीकांत गाडगे, राष्ट्रीय सेवा योजना विभागप्रमुख प्रा. डॉ. आदिनाथ लोंढे, प्रा. दत्तराज जगताप आणि प्रा. मंगेश गायकवाड यांनी विशेष सहकार्य केले.

### योगाला शिक्षण, रोजगाराशी जोडावे : राज्यपाल



**लोणावळा :** भारताच्या युवा शक्तीला योग्य दिशा देण्यासाठी योगाला शाळा-महाविद्यालयांच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनविणे आवश्यक आहे. प्रत्येक शाळा व महाविद्यालयात पात्र योग शिक्षक अथवा प्रशिक्षकाचे स्वतंत्र पद निर्माण केल्यास युवकांच्या आरोग्य व व्यक्तिमत्त्व विकासासोबत प्रशिक्षित योग व्यावसायिकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण होतील, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले. लोणावळा येथील कैवल्यधाम योग संस्थेत स्वामी कुवलयानंद यांच्या १४३व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात राज्यपाल बोलत होते. यावेळी माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू, कैवल्यधामचे सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी सुबोध तिवारी, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, प्रबंधक परिषदेच्या सदस्या पुष्पा मांडके उपस्थित होते.

## पोंदेवाडीत कांदा चाळीत चोरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी धामणी :** आंबेगाव तालुक्यातील पोंदेवाडी येथे शेतकरी मयूर आनंदराव रोडे यांच्या कांदा चाळीतून अंदाजे २५ ते २६ कांदा पिशव्या चोरीला गेल्याची घटना समोर आली आहे. कांद्याला सध्या समाधानकारक बाजारभाव मिळत असल्याने चोरट्यांनी कांदा चाळींना लक्ष्य केल्याचे दिसून येत आहे. बाजार समित्यांमध्ये कांद्याला सध्या साधारण ३० ते ५० रुपये प्रतिकिलो दर मिळत आहे. त्यामुळे आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील अनेक शेतकऱ्यांनी भविष्यात चांगला भाव मिळेल, या अपेक्षेने मोठ्या प्रमाणात कांदा चाळीत साठवून ठेवला आहे.

पूर्व भागातील अनेक कांदा चाळी घरापासून दूर असल्याने रात्रीच्या वेळी तेथे फारसे लक्ष राहत नाही. याचा फायदा चोरटे घेत असल्याची चर्चा शेतकऱ्यांमध्ये आहे. पोंदेवाडीतील चोरीच्या घटनेमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले असून, कांदा चाळींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. कांदा चाळीत साठवलेल्या शेतमालाच्या सुरक्षेसाठी शेतकऱ्यांनी सतर्क राहण्याची गरज असून, चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी संबंधित यंत्रणेनेही गस्त वाढवावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

> माझ्या कांदाचाळीतुन साधारण पंचवीस ते सव्वीस कांदा पिशव्या चोरट्यांनी चोरून नेल्या आहेत यामध्ये माझे साधारण पंचावन्न ते साठ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे सदर चोरीबाबत कायदेशीर प्रक्रिया मी पार पाडली आहे
>
> -मयुर आनंदराव रोडे, शेतकरी पोंदेवाडी

> कांदा उत्पादन घेण्यास मोठे भांडवली खर्च आहे यामध्ये कधी निसर्गनिर्मित तर कधी मानव निर्मित संकट येत आहे यामध्ये कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. कांदा चाळीत साठवणूक केलेल्या कांद्याला विमाकवच मिळावे यासाठी कृषी विभागाकडे प्रयत्न करणार आहे
>
> -अंकीता वाळुंज, पंचायत समिती सदस्या आंबेगाव.



## सुप्रिया सुळेंनी घेतले भीमाशंकर ज्योतिर्लिंगाचे दर्शन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**भीमाशंकर :** आंबेगाव तालुक्यातील श्री क्षेत्र भीमाशंकर येथे खासदार सुप्रिया सुळे यांनी बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या भीमाशंकर ज्योतिर्लिंगाचे अभिषेक करून मनोभावे दर्शन घेतले.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध मान्यवर उपस्थित होते. यामध्ये देवदत्त निकम, पंचायत समिती सदस्य श्वेताताई ढोबळे, पंचायत समिती सदस्य प्रियंकाताई वाघ, मंचर नगरसेवक लखन पारधी, मंचर नगरसेविका अंजली निलेश बाणखेले, साधनाताई धुमाळ, राजश्री निकम आणि केतन वाघ यांचा समावेश होता.दर्शनानंतर खासदार सुळे यांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी सामाजिक आणि स्थानिक विषयांवर चर्चा केली. तसेच भीमाशंकर देवस्थान परिसरातील विविध बाबींवरही चर्चा करण्यात आली. खासदार सुळे यांच्या उपस्थितीमुळे परिसरातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते.

## विशेष मुलांसाठीच्या सेवेला 'सार्थक सेवा सन्मान'

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**कवठे येमाई :** विशेष मुलांचे शिक्षण, संगोपन, प्रशिक्षण आणि सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या आकांक्षा एज्युकेशनल फाउंडेशनच्या सामाजिक कार्याचा 'सार्थक सेवा सन्मान' देऊन गौरव करण्यात आला.सार्थक संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सार्थक संस्थेच्या संस्थापिका व अध्यक्षा स्वाती नामजोशी, प्रमुख पाहुण्या पूनम किर्लोस्कर आणि निरंजन किर्लोस्कर यांच्या हस्ते आकांक्षा एज्युकेशनल फाउंडेशनच्या प्रतिनिधींना सन्मानचिन्ह व पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी संस्थेच्या सेवाभावी कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक मदतही देण्यात आली. विशेष मुलांमधील क्षमता ओळखून त्यांना शिक्षण, प्रशिक्षण आणि आत्मनिर्भरतेच्या संधी उपलब्ध करून देणे, हे आकांक्षा एज्युकेशनल फाउंडेशनचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

## अनिल रायकर यांची नाभिक महामंडळाच्या शिरूर तालुका सहसचिवपदी नियुक्ती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**कवठे येमाई :** महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या शिरूर तालुका सहसचिवपदी कवठे येमाई येथील युवा सामाजिक कार्यकर्ते अनिल विठ्ठल रायकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महामंडळाच्या शिरूर तालुका कार्यकारिणीत त्यांचा समावेश करण्यात आल्याचे नियुक्तीपत्राद्वारे जाहीर करण्यात आले.प्रदेशाध्यक्ष कल्याणराव ढोले, कार्याध्यक्ष दामोदर बिडवे, सरचिटणीस पांडुरंग भवर, पुणे जिल्हाध्यक्ष अशोक मगर, पुणे जिल्हा विभागीय अध्यक्ष रमेश राऊत, भाऊसाहेब पंडित, गणपतराव क्षीरसागर, शिरूर तालुका अध्यक्ष रामदास जाधव व दत्तात्रय शिंदे यांच्या आदेशाने ही नियुक्ती करण्यात आली. नाभिक समाजातील बांधवांना संघटित करणे, समाजाच्या विविध प्रश्नांसाठी कार्य करणे तसेच महामंडळाच्या नियमावलीनुसार संघटनेचे कार्य प्रभावीपणे पुढे नेण्याची जबाबदारी रायकर यांच्यावर सोपविण्यात आली आहे.या नियुक्तीबद्दल कवठे येमाई येथील ग्रामस्थांसह विविध स्तरातून रायकर यांचे अभिनंदन होत असून, त्यांच्या माध्यमातून शिरूर तालुक्यात नाभिक समाजाच्या संघटनात्मक कार्याला अधिक बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## आळंदीत फेरीवाल्यांच्या मागण्यांसाठी आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आळंदी :** फेरीवाले व पथविक्रेत्यांना ओळखपत्र, विक्री परवाना देण्यासह बायोमेट्रिक सर्वेक्षण पूर्ण करावे, या मागणीसाठी फेरीवाला हॉकर्स महासंघाने आंदोलनाचा इशारा दिला आहे. मागण्या मान्य न झाल्यास ३ सप्टेंबर रोजी आळंदी नगरपरिषदेसमोर लाक्षणिक उपोषण करण्यात येणार असल्याचे महासंघाने सांगितले.

याबाबत फेरीवाला हॉकर्स महासंघाचे उपाध्यक्ष मल्हार काळे यांनी जिल्हाधिकारी व प्रांताधिकाऱ्यांना निवेदन दिले. आळंदी नगरपरिषद हद्दीतील फेरीवाले व पथविक्रेत्यांना अद्याप ओळखपत्र व विक्री परवाने देण्यात आलेले नाहीत. तसेच व्यवसायासाठी जागा निश्चित करण्यात आलेली नसून 'प्रधानमंत्री पथविक्रेता' या नावाची ओळखपाटीही देण्यात आलेली नसल्याचे काळे यांनी सांगितले.

भाडे धोरण तसेच बायोमेट्रिक सर्वेक्षणाबाबत माहितीच्या अधिकारात माहिती मागूनही नगरपरिषदेकडून समाधानकारक माहिती मिळत नसल्याचा आरोप महासंघाने केला आहे. पथविक्रेत्यांसाठी स्पष्ट धोरण निश्चित करून बायोमेट्रिक सर्वेक्षण पूर्ण करावे आणि माहिती अधिकारांतर्गत मागितलेली माहिती द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, जाणीव संघटनेचे सुलतानभाई शेख यांनी भाजी मंडईतील अतिक्रमण कारवाईवर आक्षेप घेत महिला विक्रेत्यांना हक्काची जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली.नगरपरिषद प्रकल्प अधिकारी वैशाली पाटील यांनी सांगितले की, ३६५ विक्रेत्यांची नोंदणी झाली असून शहर फेरीवाला समितीने त्यांना मंजुरी दिली आहे. ओळखपत्र तयार करण्याचे काम सुरू असून लवकरच त्यांचे वाटप करण्यात येईल.

## दगडूशेठ गणपती उत्सवात तीन वैद्यकीय कक्ष; आयसीयू, व्हेंटिलेटरची सुविधा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**पुणे :** गणेशोत्सवात गणपती बाप्पाच्या दर्शनासाठी होणारी लक्षावधी भाविकांची गर्दी लक्षात घेऊन श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टतर्फे यंदा उत्सव मंडप परिसरात तीन वैद्यकीय सेवा कक्ष उभारण्यात येणार आहेत. या कक्षांमध्ये आयसीयू आणि व्हेंटिलेटर बेडची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने यांनी दिली.

गणपतीच्या आगमनापासून विसर्जन मिरवणुकीपर्यंत ही वैद्यकीय सेवा कार्यरत राहणार आहे. गणपती मंदिराच्या गेट क्रमांक १ येथे प्रथमोपचार केंद्र, गणपती मंदिराशेजारी तसेच बेलबाग चौकात आयसीयू व व्हेंटिलेटर बेडची सुविधा उपलब्ध राहणार आहे. याशिवाय मंडप परिसरात पाच ठिकाणी अद्ययावत कार्डियाक रुग्णवाहिका आणि दिव्यांग भाविकांसाठी व्हीलचेअरची व्यवस्था करण्यात आली आहे.उत्सव काळात दररोज ५५ जणांचे वैद्यकीय पथक कार्यरत राहणार असून, महाराष्ट्र शासनाच्या पाच कार्डियाक रुग्णवाहिका आणि ट्रस्टच्या चार रुग्णवाहिका सेवेत असतील. विसर्जन मिरवणुकीच्या दिवशी पांचाळेश्वर घाटावर चार रुग्णवाहिका तैनात करण्यात येणार असून, तेथे प्राथमिक उपचाराची सुविधा उपलब्ध असेल. भाविकांची आरोग्यसुरक्षितता राखणे ही ट्रस्टची जबाबदारी मानून गेल्या चार वर्षांपासून उत्सव काळात आयसीयू सेवा सुरू ठेवण्यात आली आहे. यंदा या सेवेचा विस्तार करण्यात आला आहे. राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाचे संचालक, पुणे महापालिकेचा आरोग्य विभाग तसेच शहरातील नामांकित रुग्णालयांचा या उपक्रमात सहभाग राहणार आहे.ट्रस्टचे विश्वस्त आणि सुवर्णयुग तरुण मंडळाचे कार्यकर्ते व पदाधिकारी वैद्यकीय सेवेचे व्यवस्थापन पाहणार आहेत. ट्रस्टच्या वैद्यकीय सेवा कक्षाचे व्यवस्थापक राजेंद्र परदेशी आणि त्यांचे सहकारी सर्व कक्षांचा समन्वय साधणार आहेत.

# भरड धान्यांमुळे पोषणासह शाश्वत शेतीला चालना

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** ३० ऑगस्ट हा जागतिक भरड धान्य दिवस म्हणून साजरा केला जात असून, भरड धान्यांचे पोषणमूल्य, आरोग्यदायी आहारातील महत्त्व, शाश्वत शेती आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीतील त्यांची भूमिका याबाबत जनजागृती करण्याची गरज कृषी क्षेत्रातून व्यक्त होत आहे.

संयुक्त राष्ट्रांनी २०२३ हे आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्ष म्हणून घोषित केले होते. भारताने या उपक्रमाला विशेष प्रोत्साहन दिले. मात्र, कृषी विकास ट्रस्टचे चेअरमन राजेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली बारामती येथे २०२० पासूनच भरड धान्यांच्या प्रसार व मूल्यवर्धनाचे काम सुरू करण्यात आले आहे.

धारवाड येथील कृषी विद्यापीठातून भरड धान्यांची बियाणे आणून कृषी विज्ञान केंद्राच्या प्रक्षेत्रावर त्यांची लागवड करण्यात आली. त्यानंतर शेतकऱ्यांना लागवडीसाठी बियाणे उपलब्ध करून देण्यासह भरड धान्य प्रक्रिया व मूल्यवर्धनावरही भर देण्यात आला आहे.



कृषी विज्ञान केंद्रात अत्याधुनिक सुविधायुक्त भरड धान्य प्रक्रिया केंद्र उभारण्यात आले असून, येथे प्राथमिक तसेच द्वितीय प्रक्रियेसह पीठ, रवा, विविध प्रीमिक्स, बेकरी पदार्थ, बिस्किटे, खारी, केक, पास्ता, सेवया, लाडू, पापड आदी मूल्यवर्धित पदार्थ तयार केले जातात. तसेच रेसिपी डेव्हलपमेंट, फूड टेस्टिंग, लेबलिंग, पॅकेजिंग, ब्रँडिंग आणि मार्केटिंगसाठीही सुविधा उपलब्ध आहेत. महिला बचत गट, सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि सहकारी संस्थांना या सुविधांचा लाभ घेता येतो.

ज्वारी, बाजरी, नाचणी, कुटकी, राळ, कोदो, सावा, कांगणी आणि चेना यांचा भरड धान्यांमध्ये समावेश होतो. ही पिके कमी पाणी व कमी निविष्ठांमध्ये घेता येत असल्याने कोरडवाहू आणि दुष्काळप्रवण भागासाठी उपयुक्त ठरतात. दुष्काळ, उष्णता आणि कमी पावसाच्या परिस्थितीतही अनेक भरड धान्ये तग धरतात. त्यामुळे हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर त्यांचे महत्त्व वाढले आहे.

भरड धान्यांमध्ये तंतुमय पदार्थ, लोह, कॅल्शियम, मॅग्नेशियम, झिंक यांसारखी पोषकद्रव्ये आढळतात. पचनास उपयुक्तता, दीर्घकाळ पोट भरल्याची भावना आणि संतुलित आहारातील उपयोग यामुळे आहारात त्यांचा समावेश करण्यास प्रोत्साहन दिले जात आहे. अनेक भरड धान्ये नैसर्गिकरित्या ग्लुटेनमुक्त आहेत.

प्रक्रिया, मूल्यवर्धन, पॅकेजिंग, ब्रँडिंग आणि थेट विक्रीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्नाची संधी मिळू शकते. महिला बचत गट, ग्रामीण युवक आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांसाठीही भरड धान्य प्रक्रिया उद्योग रोजगार व उद्योजकतेचे प्रभावी माध्यम ठरू शकते.

**ग्रामपंचायत सरदवाडी, ता. शिरूर. जि. पुणे**

**जाहिर निविदा सूचना क्र. बी १/२/२०२६-२७ (प्रथम वेळ)**

सरपंच ग्रामपंचायत सरदवाडी, ता. शिरूर हे जिल्हा परिषद कडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून Percentage Rate Tender दोन लिफाफा पद्धतीने पुढील कामांची जाहिर निविदा मागवित आहेत

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रू. | निविदा फी रू. | आवश्यक ठेकेदार वर्ग | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | बंटी कुंडलिक घर ते संजय हॉटेल बंदिस्त गटर | १४००५०/- | २३६ | जि. प. पुणे नोंदणीकृत सुबेअ | ६ महिने |
| २ | सरदवाडी वार्ड क्र. १ येथे बंदिस्त गटर | १५०४९०/- | २३६ | जि. प. पुणे नोंदणीकृत सुबेअ | ६ महिने |
| ३ | गोंजारी घर ते लोंढे घर बंदिस्त गटर | ४९९५४०/- | २३६ | जि. प. पुणे नोंदणीकृत सुबेअ | ६ महिने |

१. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ग्रामपंचायत सरदवाडी, ता. शिरूर कार्यालय येथे होईल. सदर निविदेसंदर्भात निविदा नोटीस सिद्धी, सूचना, शुद्धीपत्रके इ. माहिती ग्रामपंचायत करणे सरदवाडी कार्यालय येथील नोटीस बोर्डवर उपलब्ध आहे.
२. वरील कामाची निविदा प्रपत्रे ग्रामपंचायत कार्यालय येथे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. सदर निविदा प्रपत्रे, अटी, शर्ती इ. ग्रामपंचायत सरदवाडी कार्यालय येथे दिनांक ३०/०८/२०२६ रोजी १०.३० वा. ते दिनांक ०६/०९/२०२६ चे १७.०० वा. पर्यंत ग्रा.पं तीने प्रमाणित केलेले कोरे निविदा फॉर्म विक्री करण्यात येतील.
३. वरिल कामाच्या निविदा दिनांक ३१/०८/२०२६ रोजी १०.३० वा. ते दिनांक ०७/०९/२०२६ चे १७.०० वा. पर्यंत ग्रामपंचायत सरदवाडी कार्यालयात सादर करता येतील.
४. ग्रामपंचायत मार्फत उपलब्ध करून दिलेल्या निविदा फॉर्म सोबतच्या सूचना पत्रामधील अटीं व शर्ती निविदाधारकास बंधनकारक राहतील.
५. जाहिर निविदा दि. ०८/०९/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील. सदर दिवशी जाहिर निविदा उघडणे शक्य न झाल्यास कार्यालयाच्या वेळेच्या सोयीनुसार उघडण्यात येतील.

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत सरदवाडी
ता. शिरूर, जि. पुणे

सरपंच
ग्रामपंचायत सरदवाडी
ता. शिरूर, जि. पुणे

## द•ख•ल

### श्रीराम विद्यालयात रक्षाबंधन, नारळी पौर्णिमा व राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा

**ढोरजळगाव :** श्रीराम माध्य व उच्च माध्य विद्यालय, ढोरजळगाव येथे रक्षाबंधन, नारळी पौर्णिमा तसेच राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहपूर्ण व आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला.विविधतेत एकता, भाऊ-बहिणीच्या प्रेमाचे पवित्र नाते, भारतीय संस्कृती-परंपरांचे जतन आणि निरोगी जीवनासाठी क्रीडांचे महत्त्व यांचा सुंदर संगम या कार्यक्रमातून अनुभवायला मिळाला. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजनाने करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य संजय चेमटे होते. रक्षाबंधनाचे औचित्य साधून विद्यार्थिनींनी विद्यार्थ्यांना, गुरुजनांना तसेच विद्यालय परिसरातील वृक्षांना राख्या बांधून बंधुभाव, प्रेम, आपुलकी आणि निसर्गसंवर्धनाचा संदेश दिला. विशेष म्हणजे विद्यालयातील 'राखी बनवा' कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या आकर्षक राख्यांचे अध्यक्ष प्राचार्य संजय चेमटे यांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांनी विविध आकारांच्या सुंदर राख्या तयार करून त्यातील मोठ्या राख्या वृक्षांनाही बांधल्या.

यावेळी विद्यार्थिनी कु. अंकिता वाघमारे व कु. प्रणाली खोसे यांनी रक्षाबंधन व राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त मनोगत व्यक्त केले. शिक्षक प्रतिनिधी शितल गोरे व अमोल भालसिंग, प्राचार्य संजय चेमटे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक श्रीमती वैशाली धोंडे व कु समीक्षा जायभाये यांनी केले. सूत्रसंचालन श्रीमती कविता लोखंडे व कु गिरिजा देशमुख यांनी केले, तर कु दिव्या बुधवंत हिने उपस्थितांचे आभार मानले. यावेळी पर्यवेक्षिका सुरेखा शेलार,शंकर खोले, पांडुरंग व्यवहारे, सुधाकर आल्हाट, सुरेश तेलोरे, सविता सातपुते, संजय पवार, राहुल दहातोंडे, रावसाहेब पवार, सचिन कुलकर्णी, सुदाम काळे, विनोद फलके, निलेश कोहक, महेश शेळके, रत्नमाला फलके, संगिता बुधवंत, स्वाती गरड, कु. स्वाती भालसिंग यांच्यासह विद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



### स्वा.सै. मोहनराव गाडे यांच्या प्रतिमेचे अनावरण

**पाथर्डी शहर:** ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक कै. मोहनराव गाडे यांच्यासह भगवान महावीर, भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम आणि लोकशाहीर वामनदादा कर्डक यांच्या प्रतिमांचे अनावरण शुक्रवारी (दि. २९) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष प्रा. किसन चव्हाण यांच्या हस्ते प्रतिमांचे अनावरण करण्यात आले.

यावेळी प्रा. किसन चव्हाण यांनी समाजातील एकोपा, विधायक विचार आणि सामाजिक कार्याचे महत्त्व अधोरेखित केले. समाजासाठी प्रामाणिकपणे कार्य करणाऱ्या व्यक्तीच्या कार्याची दखल समाज घेतो आणि त्यांचे योगदान भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरते, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमास भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष श्रीपत बळीत, प्रा. संजय राजगुरू, उद्योजक एकनाथ ठोकळ, सेवानिवृत्त तहसीलदार जगदीश गाडे, प्रा. डोळस, रोहिणी ठोंबे, संतोष काळोखे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर व धम्म बांधव-भगिनी उपस्थित होते. यावेळी प्रा. किसन चव्हाण यांचा सेवानिवृत्त तहसीलदार जगदीश गाडे आणि आयुष्यमती मंदाकिनी गाडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. महेंद्र राजगुरू यांनी केले, तर आभार प्रदर्शन पप्पू बोर्डे यांनी केले.



### डॉ.प्रकाश घनवट 'आरोग्यरत्न' तर नितीन काकडे 'समाजभूषण' पुरस्काराने सन्मानित

**हातगाव:** शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथील मूळचे रहिवाशी असणारे व सध्या पुणे या ठिकाणी अल्पकाळात यशस्वी ठरणारे तरुण किरण घोरतळे यांनी स्थापन केलेल्या राजे शिवराय प्रतिष्ठान व राजे शिवराय बहुउद्देशीय फाउंडेशन महाराष्ट्र राज्य संस्थेचे संस्थापक ,सचिव यांच्या वतीने दिला जाणारा पुणे सांस्कृतिक महोत्सव २०२६ तर्फे दिला जाणारा वेग - वेगळ्या विभागाचा राज्यस्तरीय गौरव पुरस्कार वितरण सोहळा नुकताच पुणे येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, सभागृह,बिबवेवाडी येथे विविध क्षेत्रातील प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला असून या कार्यक्रमात बोधेगाव येथील श्री केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याचे माजी व्हाइस चेअरमन डॉ. प्रकाश गंगाधर घनवट यांनाआरोग्य रत्नतर माजी जिल्हा परिषद सदस्य नितीन मनोहर काकडे यांना समाजभूषण तसेच श्री शिवाजी हायस्कूलचे शिक्षक विकास दशरथ भापकर यांना आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर होऊन त्याचे वितरण नुकतेच पुणे येथे पार पडले आहे. या वेळीसामाजिक,राजकीय,शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रातील जवळपास २१मान्यवरांचा उल्लेखनीय कार्याबद्दल सन्मान करण्यात आला असून अभिजीत औटी यांचे अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमासाठी प्रा. डॉ. बिपीन सुळे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. राजे शिवराय प्रतिष्ठानचे सचिव किरण घोरतळे यांनी प्रास्ताविक केले.



### राजेंद्र नष्टे यांना 'आदर्श प्राचार्य राष्ट्र गौरव पुरस्कार'

**राशीन:** ; शिक्षण क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी उल्लेखनीय योगदान देणारे राशीनचे सुपुत्र राजेंद्र नष्टे यांना प्रतिष्ठेचा 'आदर्श प्राचार्य राष्ट्र गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव झाल्याने राशीन परिसराच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. रविवार दि. ३० ऑगस्ट रोजी दुपारी १२.४५ वाजता आळंदी येथील 'द कल्चर हॉटेल' येथे हा पुरस्कार सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. डॉ. युवराज ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सोहळ्याचे उद्घाटन तृप्तीताई देसाई यांच्या हस्ते झाले. यावेळी मेघराज राजेभोसले यांची विशेष उपस्थिती होती. भूमाता ब्रिगेडायरी च्या तृप्तीताई देसाई यांच्या हस्ते राजेंद्र नष्टे यांना 'आदर्श प्राचार्य राष्ट्र गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

राजेंद्र नष्टे यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल राशीन येथील ज्येष्ठ नागरिकांच्या वतीने त्यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले. यावेळी शरदचंद्र शेटे सर, शहाणे गुरुजी, घोडके गुरुजी, देविदास सोनवणे सर, देविदास साळवे, ससाणे गुरुजी, ब. भा. को. साळवे गुरुजी तसेच कदीरशेठ कर्जतकर यांनी नष्टे यांच्या शैक्षणिक कार्याचे मनापासून कौतुक केले.

# जेऊर परिसरात 'ऑपरेशन मजनू' राबवा ; शाळा परिसरात टपोरींचा वावर

## धूम स्टाईल गाड्या; कर्कश हॉर्न, विद्यार्थिनींना कट मारण्याचे प्रकार ; पालकांमध्ये संताप

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**नगर तालुका:** जेऊर परिसरातील शाळा तसेच शाळेकडे जाणाऱ्या रस्त्यांवर टपोरी मुलांचा घोळका वाढत असून विद्यार्थिनींना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. शाळा परिसरात विनाकारण थांबणाऱ्या आणि दुचाकींवरून धूम स्टाईलने ये-जा करणाऱ्या तरुणांवर पोलिसांनी कडक कारवाई करावी अशी मागणी पालक व नागरिकांमधून होत आहे.

शाळा भरण्याच्या आणि सुटण्याच्या वेळेत काही तरुणांकडून कर्कश हॉर्न वाजविणे, भरधाव वेगाने दुचाकी चालविणे,



विद्यार्थिनींना कट मारणे तसेच शाळेच्या प्रवेशद्वाराजवळ घोळका करून उभे राहणे असे प्रकार होत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे विद्यार्थिनींना सुरक्षित आणि मोकळ्या वातावरणात शिक्षण घेणे कठीण होत आहे.

यापूर्वी शिक्षकांना अरेरावी, विद्यार्थ्यांना मारहाण तसेच रोड रोमिओंमध्ये आपापसात हाणामाऱ्या असे प्रकार घडलेले आहेत. शाळा परिसरात तसेच जेऊर मधून महाविद्यालयीन शिक्षणासाठी नगरला जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या देखील जास्त आहे. त्यामुळे बस स्थानक परिसरात देखील दिवसेंदिवस मजनुंची संख्या वाढताना दिसून येत आहे. रोड रोमिओंच्या धाकामुळे पालकांना आपली कामे सोडून विद्यार्थिनींना ने-आण करावी लागत आहे.

रोड रोमिओंमुळे जेऊर पंचक्रोशीतील वातावरण दूषित होत आहे. त्याचे झालेले विपरीत परिणाम परिसरात गेल्या काही दिवसात घडलेल्या घटनांवरून जाणवते. विद्यार्थिनीही शिक्षण बंद होईल या भीतीपोटी घडलेला प्रकार शिक्षक अथवा घरी सांगत नाहीत त्याचाच गैरफायदा 'मजनू' घेत असल्याचे वारंवार दिसून येत आहे.

शाळा परिसरात 'ऑपरेशन मजनू' राबविण्याची गरज निर्माण झाली आहे. शाळा सुटण्याच्या वेळेत पोलिसांनी विशेष लक्ष दिल्यास अशा टवाळखोरांना आळा बसू शकतो. अशा टवाळखोर मजनूंवर कडक कारवाई करण्याची मागणी विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांमधून जोर धरू लागली आहे.

मागील महिन्यात एमआयडीसी पोलिसांनी मजनूविरोधात आक्रमक पवित्रा घेत धडक कारवाई केल्याने शाळा परिसरातील टवाळखोर गायब झाले होते. मात्र आता शाळा परिसरात त्यांचा वावर वाढू लागल्याने विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे पोलिसांनी पुन्हा 'ऑपरेशन मजनु' राबवून टवाळखोरांना लगाम घालावा अशी मागणी जेऊर पंचक्रोशीतील ग्रामस्थांकडून होत आहे.

# श्रीगोंद्यात खासगी वाहनांतून प्रवासी वाहतूक; आरटीओच्या दुर्लक्षावर प्रश्नचिन्ह

दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यात खासगी वाहनांचा प्रवासी वाहतुकीसाठी सर्रास वापर होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. नियमबाह्य पद्धतीने प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याची जबाबदारी प्रादेशिक परिवहन विभागाची असताना, संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांचे याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

तालुक्यातील विविध गावांमधून श्रीगोंदा शहराकडे ये-जा करण्यासाठी अनेक नागरिक खासगी जीप, चारचाकी तसेच इतर वाहनांचा वापर करतात. काही वाहनांमधून क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी बसविले जात असल्याच्या तक्रारीही आहेत. परिणामी प्रवाशांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

दरम्यान, प्रादेशिक परिवहन विभागाचे अधिकारी या प्रकाराकडे गांभीर्याने पाहून प्रत्यक्ष कारवाई करणार का, की खासगी प्रवासी वाहतूक अशीच सुरू राहणार, याकडे आता श्रीगोंदा तालुक्याचे लक्ष लागले आहे.

**परवाना, फिटनेस आणि विम्याचे काय?**

प्रवासी वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांकडे आवश्यक परवाना, फिटनेस प्रमाणपत्र, विमा तसेच इतर वैधानिक कागदपत्रे आहेत का, याची नियमित तपासणी होणे अपेक्षित आहे. मात्र प्रत्यक्षात रस्त्यावर नियमबाह्य प्रवासी वाहतूक सुरू असतानाही आरटीओची तपासणी मोहीम प्रभावीपणे दिसत नसल्याची नागरिकांची तक्रार आहे.

विशेष म्हणजे, अपघात झाल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. प्रवाशांच्या जीवाशी संबंधित विषय असल्याने केवळ कागदी कारवाई न करता प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून तपासणी करण्याची मागणी होत आहे.

**'कारवाई कधी होणार?' नागरिकांचा सवाल**

खासगी वाहनातून प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांची तालुक्यात मोहीम राबवून तपासणी करावी. क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी वाहतूक, विनापरवाना प्रवासी वाहतूक किंवा आवश्यक कागदपत्रांचा अभाव आढळल्यास संबंधित वाहनांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.



# गहाळ झालेला मोबाईल ११२ च्या मदतीने मूळ मालकास परत...

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** : कामाच्यानिम्मित एक युवक वालवड (ता.कर्जत) येथे दुचाकीवर जात असताना त्याचा मोबाईल रस्त्यावर पडला. याच वेळी अहिल्यानगर येथील काही पर्यटक रेहेकुरी अभयारण्य येथे निसर्ग सफरीसाठी येत असताना तो मोबाईल त्यांना मिळाला. त्यांनी तात्काळ कर्जत पोलीसांना ११२ वर माहिती देत मोबाईल मिळाल्याचे कळवले असता तो मोबाईल मूळ मालकास अनपेक्षित परत सुपूर्द करण्यात आला.

रविवारी भिगवण (पुणे) येथील किशोर धेंडे हा युवक कामानिमित्त वालवड येथे दुचाकीवर जात असताना त्याचा मोबाईल गहाळ झाला. पुढे गेल्यावर देखील त्याच्या लक्षात आले नाही. याच वेळी अहिल्यानगर येथील निसर्गप्रेमी पर्यटक सुरेंद्र दराडे, प्रकाश साठे, प्रवीण जाधव आणि दीपक चव्हाण कर्जतच्या रेहेकुरी अभयारण्य येथे पर्यटन सफरीसाठी येत असताना त्यांना तो मोबाईल रस्त्यावर मिळून आला. या चार ही जणांनी सामाजिक दायित्वाच्या भावनेने कोणा गरजवंताचा मोबाईल त्याला परत कसा देता येईल या जबाबदारीने कर्जत पोलिसांना ११२ वर रस्त्यावर मिळून मोबाईलची हकीकत दिली. कर्जतचे पोलीस निरीक्षक हनुमान गायकवाड यांनी पेट्रोलियम गस्तीवर असणारे पोलीस कर्मचारी संजय सानप आणि वाहन चालक जालिंदर शिंदे यांना कळवत मोबाईल ताब्यात घेण्यास सांगितले. मोबाईल ताब्यात घेतानाच त्याच मोबाईलवर मूळ मालक किशोर धेंडे याने कॉल केला असता वरील चौघांनी आणि पोलीस कर्मचाऱ्यांनी त्यास कर्जत येथे बोलावत योग्य शहानिशा करीत त्याला परत दिला. हरवलेला मोबाईल अहिल्यानगरच्या निसर्गप्रेमींच्या प्रामाणिकपणा आणि कर्जत पोलिसांच्या तत्परतेने परत मिळाल्याची भावना किशोरने व्यक्त केली.

### आज हरेश्वर येथे यात्रा उत्सव

**शिराळ चिचोंडी :**



लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र हरेश्वर येथे तिसऱ्या श्रावणी सोमवार निमित्त ३१ ऑगस्ट रोजी यात्रा भरते सोमवारी सकाळी प्रवारा संगम येथून कावडीने आणलेल्या गंगाजलची भव्य वाजत गाजत मिरवणूक काढण्यात येते त्यानंतर या गंगाजलने हरेश्वरला जलाभिषेक करण्यात येतो

श्रावणी सोमवार निमित्त परिसरातील हजारो भाविक हरेश्वर दर्शन घेण्यासाठी हरेश्वर येथे मोठीगर्दी करतात.

हरेश्वर येथे मोठी यात्रा भरते यात्रेमध्ये खेळणी मिठाई रहाट पाळणे फुलाची दुकाने बैलांना लागणारा साज अशी अनेक प्रकारचे दुकाने थाटतात भाविकांना दर्शन घेण्यासाठी स्वतंत्र बारीची व्यवस्था करण्यात येतअसल्याची माहिती हरेश्वर संस्थांचे महंत भगवान महाराज मचे यांनी सांगितले.

हरेश्वर येथे पिण्याची पाण्याची तसेच पार्किंगची व महाप्रसादाची व्यवस्था करण्यात येते.

हरेश्वर येथे मोठी विकास कामे सुरू असल्याची माहिती हरेश्वर संस्थांचे अध्यक्ष भगवान महाराज मचेयांनी सांगितले या विकास कामामुळे हरेश्वर संस्थान खूप मोठे देवस्थान म्हणून ओळखले जाते.

# आज श्री क्षेत्र वृद्धेश्वर येथे यात्रोत्सव

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**तिसगाव :** श्री क्षेत्र वृद्धेश्वर येथे तीसऱ्या श्रावणी सोमवार निमीत्त मोठी यात्रा भरते आज तिसरा श्रावणी सोमवारी भरणाऱ्या यात्रेची देवस्थान समीतीकडुन तयारी पुर्ण झाली असुन मोफत पिण्याचे पाणी , प्रसाद वाटप देवस्थान समितीकड्डन केले जाते .विविध गावांचे भावीक पायी चालत अथवा कावडी घेऊन वृद्धेश्वरच्या दर्शनासाठी येतात अशी माहिती देवस्थान समितीचे अध्यक्ष गणेश पालवे यांनी दिली.

सोमवारी पहाटे सहा वाजता आमदार अक्षय कर्डिले, आमदार मोनिकाताई राजळे, आमदार शिवाजीराव गर्जे,भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस कृष्णा राजळे, प्रांताधिकारी प्रसाद मते, तहसीलदार डॉक्टर उद्धव नाईक , पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्यासह प्रमुख मान्यवरांच्या हस्ते विधीवत महापूजा होणार आहे.



तिसऱ्या श्रावणी सोमवार निमित्त श्रीक्षेत्र वृद्धेश्वर येथे राज्यभरातून लाखो भाविक स्वयंभू वृद्धेश्वराच्या शिवलिंगाचे दर्शन घेण्यासाठी मोठ्या संख्येने येतात. चारोधाम पैकी एक धाम म्हणून देखील या देवस्थानची ओळख आहे. वृद्धेश्वर येथे दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांसाठी देवस्थान समीतीने जोरदार तयारी केली असून भाविकांच्या वाहन पार्किंगची व्यवस्था,दर्शनबारीची व्यवस्था,पिण्याच्या पाण्याची व्यवस्था,खिचडीची व्यवस्था या ठिकाणी करण्यात आली आहे. सोनई येथील महाकाल तरुण मंडळाच्या वतीने सोमवारी वृद्धेश्वराच्या पिंडीसह वृद्धेश्वर मंदिरावर आकर्षक फुलांची सजावट केली जाणार आहे. येथे येणाऱ्या भाविकांसाठी निवासस्थानाची देखील व्यवस्था भक्तनिवासस्थानामध्ये करण्यात आली आहे. त्यामुळे तिसऱ्या श्रावणी सोमवार निमित्त भाविकांनी स्वयंभू आदिनाथाच्या दर्शनासाठी आवर्जून उपस्थित रहावे व दानपेटीतच दान टाकावे असे आवाहन देवस्थानचे अध्यक्ष गणेश पालवे यांनी केले आहे.



# झाडाला राखी बांधून रक्षाबंधन साजरे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगांव :** रक्षाबंधन हा सण आपल्या भारतीय संस्कृतीतील अत्यंत पवित्र, प्रेमळ व भावनिक नात्याची आठवण करून देणारा दिवस आहे. राखीचा धागा अतिशय छोटा असतो पण त्या धाग्यात अप्रतिम प्रेम, विश्वास आणि जबाबदारी सामावलेली असते. म्हणूनच रक्षाबंधन आपल्या नात्याचे संरक्षण करण्याची आणि त्यांच्या प्रती आपली जबाबदारी निभावण्याची शिकवण देते असे प्रतिपादन दत्तात्रय पवार यांनी केले.

भातकुडगाव माध्य व उच्च माध्य विद्यालयात रक्षाबंधन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य सुरेश शेरे म्हणाले रक्षाबंधनाचा अर्थ केवळ बहिणीने भावाच्या हातावर राखी बांधणे आणि भावने तिचे रक्षण करण्याचे वचन देणे इतकाच मर्यादित नाही. रक्षाबंधन म्हणजे विश्वास, प्रेम, आपुलकी, सन्मान, जबाबदारी आणि आयुष्यभर एकमेकांच्या सुख दुःखात सोबत राहण्याची प्रतिज्ञा.

यावेळी विद्यालयातील शिक्षक सुरेश कांबळे, नवनाथ पवार, संजय बाबर, प्रदीप टाके तसेच कु. साक्षी वडने, कु. कोमल वडने यांनी मनोगत व्यक्त केले. सुनील करंडे यांनी सूत्रसंचालन केले तर भास्कर शिंदे यांनी आभार मानले.

# जिल्हास्तरीय करिअर मॅपिंग कार्यशाळेचे आज आयोजन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र आणि छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर जिल्हास्तरीय करिअर मॅपिंग एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता महाविद्यालयातील सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सभागृहात ही कार्यशाळा होणार आहे.

विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडी, क्षमता आणि कौशल्यांनुसार करिअरच्या विविध संधींची माहिती मिळावी, तसेच त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळावी, हा कार्यशाळेचा प्रमुख उद्देश असल्याचे महाविद्यालयाचे प्राचार्य तथा अहिल्यानगर जिल्हा प्राचार्य प्रवर्तक डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी यांनी सांगितले. महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये सध्या करिअर मॅपिंग कार्यशाळांचे आयोजन करण्यात येत आहे.

# चिमुकल्यांच्या भविष्यासाठी ज्ञानदानाची अखंड ज्योत !

## बालकांना शिक्षण व संस्कारांची देणगी देणाऱ्या छायाबाई भोसले यांचे कार्य प्रेरणादायी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी शहर :** शिक्षणाच्या माध्यमातून समाजाची भावी पिढी घडविण्याचे कार्य अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. विशेषतः बालवयात मिळणारे शिक्षण आणि संस्कार हे आयुष्याची दिशा ठरवितात. हीच जबाबदारी मनापासून स्वीकारून श्रीमती छायाबाई संभाजी भोसले या गेल्या अनेक वर्षांपासून लहान मुलांना शिक्षणासह चांगल्या संस्कारांचे धडे देण्याचे उल्लेखनीय कार्य करीत आहेत.

बालकांना खेळीमेळीच्या आणि आनंददायी वातावरणात शिकवून त्यांच्या शिक्षणाची



भक्कम पायाभरणी करण्यावर त्यांचा विशेष भर राहिला आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक बालकांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण झाली असून, आत्मविश्वासाने व्यक्त होण्याची क्षमता विकसित झाली आहे. प्रेम, आपुलकी आणि संयमाच्या बळावर मुलांशी संवाद साधत त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्याचे त्यांचे कार्य विशेष उल्लेखनीय ठरत आहे.

विशेष म्हणजे, गेल्या अनेक वर्षांपासून बालशिक्षणाच्या या कार्यात त्यांचे सातत्य कायम आहे. सामान्य व गरजू कुटुंबातील बालकांनाही शिक्षणाची संधी मिळावी आणि त्यांच्यामध्ये चांगले संस्कार रुजावेत, यासाठी त्या मनापासून परिश्रम घेत आहेत. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाबरोबरच शिस्त, सामाजिक जाणीव आणि चांगल्या मूल्यांची जोपासना करण्यावर त्यांचा भर असतो.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली शिकणारी मुले हुशार, बोलकी आणि आत्मविश्वासपूर्ण बनत असल्याचे दिसून येते. प्रत्येक बालकाच्या क्षमतेची ओळख करून त्याला प्रोत्साहन देण्याची त्यांची कार्यपद्धती पालक आणि समाजासाठीही प्रेरणादायी ठरत आहे.

बालकांच्या भविष्याची चिंता मनात ठेवून सातत्याने सुरू असलेले हे कार्य केवळ शिक्षणापुरते मर्यादित नसून, एका सक्षम आणि संस्कारक्षम पिढीच्या जडणघडणीसाठी दिलेले महत्त्वपूर्ण योगदान आहे. दीर्घकाळापासून प्रामाणिकपणे आणि समर्पित भावनेने सुरू असलेल्या या कार्याची योग्य दखल घेणे ही काळाची गरज असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

चिमुकल्यांच्या हातात ज्ञानाची शिदोरी आणि मनात संस्कारांचे बळ देत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या श्रीमती छायाबाई संभाजी भोसले यांची शैक्षणिक वाटचाल निश्चितच प्रेरणादायी आणि समाजासाठी दिशादर्शक ठरत आहे.

दैनिक राष्ट्र सह्याद्री
सोमवार दि.३१ ऑगस्ट २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८




॥ ॐ साई राम ॥

मार्गदर्शक मा. ना. डॉ. श्री. राधाकृष्ण विखे पाटील, मा. खा. डॉ. सुजय दादा विखे पाटील
व शिर्डी ग्रामस्थ आयोजित



# श्री साई पारायण तिर्थयात्रा - 2026 (संकल्पपुर्ती)



## श्री क्षेत्र काशी - अयोध्या - मनोकामना मंदिर नेपाळ, श्री पशुपतीनाथ दर्शन यात्रा



## स्पेशल रेल्वे यात्रा



श्री.कैलास (बापू) कोते पा. (प्रथम नगराध्यक्ष, शिर्डी न.पं.)
श्री.विजय (भाऊ) कोते पा. (मा.उपनगराध्यक्ष, शिर्डी न.पं.)

### यात्रा कार्यक्रम

| | |
|---|---|
| शनिवार दि. २९/०८/२०२६ | : शिर्डी साईनगर रेल्वे स्टेशनजवळ (सप्तपदी लॉन्स), प्रस्थान - दुपारी २.०० वा. |
| रविवार दि. ३०/०८/२०२६ | : रात्री ०९.०० वा. वाराणसी आगमण वाराणसी येथे मुक्काम. |
| सोमवार दि. ३१/०८/२०२६ | : गंगा स्नान, काशी विश्वेश्वर दर्शन, अन्नपुर्णा मंदिर, गंगा आरती (गाडी व होडी व्यवस्था आहे) |
| ३ रा श्रावणी सोमवार | : रात्री ११.०० वा. अयोध्याकडे रेल्वेने प्रस्थान. |
| मंगळवार दि. ०१/०९/२०२६ | : सकाळी ०६.०० वा. अयोध्या येथे आगमन श्रीराम जन्मभुमी, कनक भवन, हनुमान गढी, राजदरबार अयोध्या दर्शन. सायं. साई भजन संध्या त्यानंतर रात्री १०.०० वा. रेल्वेने गोरखपुर / नौतनवा कडे प्रस्थान. |
| बुधवार दि. ०२/०९/२०२६ | : सकाळी ०६.०० वा. नौतनवा येथे आगमन ०७.०० वा. काठमांडू कडे २X२ Ac बस ने प्रस्थान काठमांडू येथे मुक्काम. |
| गुरुवार दि. ०३/०९/२०२६ | : पशुपतीनाथ दर्शन, बुद्धनाथ दर्शन, काठमांडू दर्शन, भजन संध्या, रात्री काठमांडू येथे मुक्काम. |
| शुक्रवार दि. ०४/०९/२०२६ | : पहाटे ०४.३० वा. मनोकामना मंदिर कडे २X२ Ac बस ने प्रस्थान १०.०० वा. मनोकामना मंदिर येथे आगमन. सायं. ०६.०० वा. नौतनवा कडे प्रस्थान. रात्री ११.४५ वा. नौतनवाकडुन शिर्डी कडे रेल्वेने प्रस्थान. |
| शनिवार दि. ०५/०९/२०२६ | : रेल्वे प्रवास |
| रविवार दि. ०६/०९/२०२६ | : दु. १२.०० वा. शिर्डी येथे आगमन. |

आत्तापर्यंत २५००० साईभक्तांचा १२ ज्योतिर्लिंग दर्शन यात्रेत सहभाग





आयोजक
## श्री साई सिद्धी चॅरिटेबल ट्रस्ट । श्री साई निर्माण ग्रुप
मा.श्री कैलास बापू कोते पा.    मा.श्री. विजय भाऊ कोते पा.

# साई निर्माण ग्रुप, शिर्डी

**साई निर्माण इंग्लिश मिडियम स्कूल, शिर्डी**
(दर्जेदार शिक्षण घेतात १५०० विद्यार्थी)
प्रिंन्सीपल- संदिप डांगे सर- ७५८८००५२०१

**साई निर्माण ज्युनिअर कॉलेज, शिर्डी**
(आर्ट, कॉमर्स अॅण्ड सायन्स)
प्राचार्य- राम ढगे सर- ९४०५१८२२२३

**साई निर्माण करिअर अॅकडमी, शिर्डी**
(पोलीस व आर्मी भरती पुर्वप्रशिक्षण केंद्र) (विद्यार्थी- ४००)
व्यवस्थापक- प्रमोद कदम सर- ९०११११९५२३

**साई निर्माण विजयनगर रो-हाऊस, कनकुरी**

**साई निर्माण पॅरामेडिकल इन्स्टिट्युट, शिर्डी**
व्यवस्थापक-
पंकज कांबळे सर- ७४४७६०३०७३

**साई निर्माण हॉटेल मॅनेजमेंट कोर्स, शिर्डी**
व्यवस्थापक-
विनोद नालकर सर- ९५४५३०६३२५

**साई निर्माण नागरी सहकारी पतसंस्था**
मॅनेजर-
मंगेश कोते पा.- ९६८९६८१०२०

**साई निर्माण शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिर्डी**

**साई निर्माण ड्रिम सिटी, शिर्डी**
(४०० घरांचा भव्य गृह प्रकल्प) (रेडी पजेशन)
(महाराष्ट्र शासन रेरा मान्यताप्राप्त प्रकल्प)
बुकिंगसाठी संपर्क:
तुळशीराम नायक- ८५२७६८७७०४,
कडलग सर- ७०६४६४९११

**साई एरोसिटी टाऊनशिप, शिर्डी (काकडी)**
साईबाबा इंटरनॅशनल एअरपोर्ट समोर,
७५ एकरची भव्य टाऊनशिप (एन.ए.)
बुकिंगसाठी संपर्क:
दशरथ गव्हाणे पा.- ७७२०००९११९,
अथर्व कोते पा.- ८०१४०९९११९

**साई सुहास टॉवर्स, लोणी**
(१ बीएचके फ्लॅट, २ बीएचके फ्लॅट)
७० शॉप्स व १११ फ्लॅटचा गृह प्रकल्प
बुकिंगसाठी संपर्क:
ओमकार कोते पा.- ९६३७५९९११९,
सुहास घोगरे पा.- ९७६६९५९२२२

**साई सिंधु पार्क, लोणी**
हसनापूर रोड, मुसळे वस्ती, जनसेवा ऑफिससमोर
(महाराष्ट्र शासन रेरा मान्यताप्राप्त प्रकल्प)
(१२० घरांचा भव्य गृह प्रकल्प) बुकिंगसाठी संपर्क:
संदिप वाकचौरे पा.- ९५११७१९११९,
संजय मुसळे पा.- ९९२१४५५९२७

LAUNCHING शुभारंभ
निसर्गरम्य वातावरण
## साई निर्मल पार्क
शिर्डी पिंपळवाडी रोड, ७ एकरामध्ये फार्म हाऊस प्लॉटींग

३० फुटाचे भव्य रस्ते, ड्रेनेज स्ट्रीटलाईट, पिण्याचे पाण्याची व्यवस्था तसेच शिर्डीतील २४ तास लाईटचे कनेक्शन

बुकिंगसाठी संपर्क :
मो. ९९९९९९९९९९, ८८८८८८८८८८, ९९२२३०८१७७, ८३७८८९९११९


जाहिरात संकलन :-पत्रकार अशोकराव दुशिंग शिर्डी ;कार्यालय प्रमुख शिर्डी MO - 9822771034